आजच्या औद्योगिक युगात विविध कामे यंत्राद्वारे पार पाडली जातात. व्यक्ती सर्व गोष्टींकडे शास्त्रीय दृष्टीने पाहताना आढळते. उद्योगधंद्यात वेगवेगळया यंत्रांचा वापर केला जातो. यंत्रांना जशी विश्रांती दिली जात नाही त्याप्रमाणे ती यंत्रे चालविणाऱ्या कर्मचाऱ्यासही विश्रांती दिली जात नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंत व्यक्ती यंत्राप्रमाणे काम करताना आढळते. यंत्रांवर काम करणाऱ्या व्यक्तीस विश्रांतीही कमी दिली जाते. उदा. कामावर आल्यानंतर कामगारास चहासाठी व जेवणासाठी पंधरा ते तीस मिनिटांपर्यंतच विश्रांती दिली जाते. व्यक्तीच्या मानसिक वा भावनिक गरजांची पूर्तता संघटनेत केली जात नाही. संघटनेत खेळीमेळीचे वातावरण निर्माण केले जात नाही. त्याचा अभाव असतो.

**ई) कुशल कर्मचारी उपलब्ध होत नाहीत :**

काही औपचारिक संघटनेत विशिष्ट कामासाठी कुशल कर्मचाऱ्यांचीच आवश्यकता असते. कुशल कामगारांची कमतरता असल्यास ते आपल्या कामाच्या मोबदल्यात संघटनेकडे जास्तीत जास्त पैशाची मागणी करतात. आपला पैसा वाचविण्यासाठी कुशल कामगारांच्या जागी अकुशल कामगारांची नेमणुक करतात. त्यामुळे उद्दिष्टपूर्ततेत अडथळे निर्माण होतात. उदा. शिक्षण संस्थांमध्ये B.Ed., D. Ed. पदवी न घेतलेल्या शिक्षकांची नेमणूक केली जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) औपचारिक संघटनेचे दोष / मर्यादा / तोटे सांगा.

## २.५ संघटन संरचनेचे प्रकार

औपचारिक संघटनेचा जसजसा विकास होतो तसतशी संघटना विस्तृत तर बनतेच, पण त्याचबरोबर ती गुंतागुंतीची बनते. संघटना गुंतागुतीची बनल्यामुळे संघटन कार्याचे स्वरुपही गुंतागुंतीचे बनते. अशा परिस्थितीत संघटनेच्या कार्याच्या सुलभतेसाठी तिचे विविध विभागात विभाजन केले जाते. विभागानुसार संघटन संरचनेचे काही प्रमुख प्रकार पडतात. त्यातील काही प्रमुख प्रकार खालीलप्रमाणे -

### २.५.१ रेषीय संघटन:

**अ) अर्थ :**

एखादा उद्योग जेव्हा प्रचंड आकार वा स्वरुप धारण करतो तेव्हा त्या संपूर्ण संघटनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी किंवा संघटनेचे व्यवस्थापन चांगले होण्यासाठी त्या संघटनेत रचनात्मक व्यवस्था तयार केली जाते. या व्यवस्थेत अधिकारांचे वाटप श्रेष्ठत्वाकडून कनिष्ठत्वाकडे केले जाते. वेगवेगळया स्वरुपाचे स्तर पाडून सर्वोच्च स्तरावर काम करणाऱ्या व्यक्तीला अधिक अधिकार दिले जातात. तिच्यावर अधिक जबाबदाऱ्याही असतात. ती व्यक्ती संघटनेच्या संपूर्ण कार्यभारास जबाबदार असते. तिच्या खालील स्तरावर काम करणाऱ्या व्यक्तीला त्या मानाने कमी अधिकार व जबाबदाऱ्या दिल्या जातात. जसजसा स्तर खाली जातो तसतसे अधिकार कमी होतात.

अधिकाराचे वाटप जेव्हा एका रेषेत वरच्या अधिकाऱ्याकडून खालच्या अधिकाऱ्याकडे होते तेव्हा त्यास रेषीय संघटना वा रेखात्मक संघटन असे म्हणतात. यात सर्वोच्च पदावर काम करणारी व्यक्ती निर्णय घेण्याचे काम करते तर तिच्या हाताखालच्या व्यक्ती त्याची कार्यवाही करतात.

लुईस ॲलन यांच्या मते, “रेषीय संघटन म्हणजे अशी साखळी की, ज्यात सर्वोच्च कार्यकारी मंडळापासून निम्न स्तरावर काम करणाऱ्या प्रतिनिधींपर्यंत अधिकार व जबाबदारीचे वाटप केले जाते.”

रेषीय संघटनात वरच्या स्तरावरून खालच्या स्तराकडे अधिकार व जबाबदरीचे वाटप केले जाते. वरिष्ठांचा आपल्या कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे ताबा असतो. कर्मचारी केलेल्या कामाची माहिती आपल्या वरिष्ठांना सतत देतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) संघटन संरचनेचे प्रकार स्पष्ट करा.

खालील उदाहरणाद्वारे रेषीय संघटन स्पष्ट होण्यास मदत होईल.

१) पोलिस आयुक्त यांचे पद सर्वोच्च स्वरुपाचे असते. त्यांना विविध अधिकार मिळालेले असतात. त्यांनी घेतलेल्या निर्णयाची कार्यवाही पोलीस उपायुक्त करतात. पोलीस उपायुक्तांना पोलीस आयुक्तांपेक्षा कमी अधिकार प्राप्त झालेले असतात; पण त्यांना इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसांपेक्षा अधिक अधिकार प्राप्त झालेले असतात. या संरचनेत शिपायांस कोणतेही अधिकार नसतात. तो त्याच्या वरील सर्व अधिकाऱ्यांच्या निर्णयांची अंमलबजावणी करताना आढळतो.

२) प्रत्येक स्तरावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याने इतरांशी कसे संबंध ठेवावेत, याची निश्चिती झालेली असते. उदा. पोलीस आयुक्तांशी प्रत्यक्ष संबंध फक्त पोलीस उपायुक्त ठेवू शकतो. त्यांच्याशी वार्तालाप करण्याचा अधिकार फक्त उपायुक्तांनाच असतो. शिपाई किंवा हवालदार पोलीस आयुक्तांशी सरळ संबंध प्रस्थापित करू शकत नाही. शिपाई हवालदाराशी संबंध साधू शकतो, हवालदार जमादाराशी संबंध साधतो तर जमादार पोलीस उपनिरीक्षकाशी संबंध साधतो. अशा प्रकारची साखळी संबंधांबाबत तयार झालेली असते.

३) प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कनिष्ठ व्यक्तीवर नियंत्रण असते. वरिष्ठ अधिकाऱ्यास निर्णय घेण्याचा अधिकार असतो. त्याने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी वा कार्यवाही कनिष्ठ अधिकारी करतो. कनिष्ठ अधिकारी आपण दिलेला हुकूम मानतो की, नाही, नेमून दिलेले काम योग्य प्रकारे करतो की, नाही, इतर कोणकोणत्या व्यक्तीशी संबंध ठेवतो, ते संबंध कशा प्रकारचे आहेत अशा सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवण्याचे काम वरिष्ठ अधिकाऱ्यास करावे लागते.

४) रेषीय संघटनेत प्रत्येक स्तरावर अधिकार व जबाबदारी यांचे वाटप झालेले असल्याने विशिष्ट स्तरावर काम करणाऱ्या व्यक्तीस कोणते अधिकार मिळाले आहेत? त्या अधिकारांची अंमलबजावणी तिने कशी करावी? तिचे कार्यक्षेत्र किती आहे? तिने कोणकोणत्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात? याबाबत लिखित नियम असल्याने ते स्पष्ट आणि निःसंदिग्ध असल्याने अधिकार व जबाबदारी याबाबत गोंधळ निर्माण होऊ शकत नाही. अशा प्रकारची विविध वैशिष्ट्ये रेषीय संघटनेत आढळतात.

**क) गुण किंवा फायदे**

रेषीय संघटनेचे पुढील फायदे आढळतात.

१) रेषीय संरचना हा संघटनेचा जुना आणि साधा प्रकार आहे. या प्रकारात प्रत्येक स्तरावरील अधिकाऱ्यास मिळालेले अधिकार, जबाबदाऱ्या आणि त्याने बजावायची कर्तव्ये याबाबतची माहिती त्यांना दिलेली असते. त्याची स्पष्ट जाणीव अधिकाऱ्यास असल्याने त्यांच्या मनात अधिकार व जबाबदारीबाबत कोणताही संभ्रम निर्माण होऊ शकत नाही. प्रत्येकास आपला दर्जा कळलेला असतो. मिळालेल्या दर्जानुसार प्रत्येक जण आपले कार्य पार पाडतो.

२) रेषीय संरचनेत काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस वेगवेगळे अधिकार प्राप्त झालेले असतात. प्रत्येकावर वेगवेगळ्या प्रकारची जबाबदारी सोपविलेली असते. अर्पित दर्जानुसार जबाबदारी पेलण्याचे काम प्रत्येक अधिकारी व कर्मचारी करतो. प्रत्येकाच्या जबाबदारीची आणि अधिकाराची निश्चिती झालेली असते.

३) या संरचनेत वरिष्ठ अधिकारी संघटनेच्या विकासासाठी वेगवेगळ्या प्रकारचे निर्णय घेऊ शकतो. तसेच त्याने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाही केली जात आहे की नाही, याची पाहणीसुद्धा वरिष्ठ अधिकारी करतो. वरिष्ठ अधिकाऱ्यावर टाकलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी आणि संघटनेची उद्दिष्टये पूर्ण करण्यासाठी अधिकारी निर्णय घेऊ शकतो. त्याच्यावर कोणत्याही प्रकारचे बंधन नसते.

४) रेषीय संरचनेत अधिकारांची आणि जबाबदारींची निश्चिती झालेली असते. प्रत्येकाची कामे वाटलेली असतात. निर्णय कोणी घ्यायचा व त्याची कार्यवाही कोणी करायची याबाबत निश्चितता असल्याने अधिकाऱ्यामार्फत योग्य वेळी तत्परतेने निर्णय घेतले जातात व त्यांची कार्यवाही ही लवकरात लवकर केली जाते.

५) अधिकार व जबाबदारीची वाटणी झालेली असल्याने निर्णय तत्परतेने घेतले जातातच. पण त्याचबरोबर अधिकाऱ्यांच्या हाताखाली किती कर्मचारी काम करतात, प्रत्येकास कोणते काम द्यायचे याबाबत निश्चितता असल्याने अधिकाऱ्यांना आपल्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे सुलभ जाते. तसेच परस्पर संबंधाबाबतही नियम असतात. त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांना वर्तन करावे लागते.

६) प्रत्येक अधिकारी व कनिष्ठ कर्मचारी यांच्यामध्ये काही संबंध प्रस्थापित झालेले असतात. वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ कर्मचाऱ्यावर जसा अवलंबून असतो तसाच वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कनिष्ठ कर्मचारी अवलंबून असतो. परस्परावलंबन तत्त्वामुळे संघटनेचा विकास घडवून आणण्यास सर्वजण एकत्रितपणे प्रयत्न करतात. परिणामतः संघटनेचा विकास लवकर घडून येतो.

वरील सर्व घटक संघटनात्मक विकास रेषीय मार्गाने घडवून आणतात. रेषीय संघटनेत आढळणाऱ्या गुणांमुळे आधुनिक काळातही या प्रकारचा वापर बऱ्याच ठिकाणी केला जातो.

**ड) तोटे / दोष :**

रेषीय संघटनेचे जसे फायदे असतात तसेच त्याचे काही तोटेही आहेत. हे तोटे पुढीलप्रमाणे -

**१) वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त बोजा :**

या प्रकारात संघटनेचे विविध स्तरावरील आणि विभागात विभाजन केले जाते. प्रत्येक विभागात अनेक कर्मचारी काम करतात. त्यांच्या कामाची वाटणी केलेली असते. परंतु त्या सर्व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे काम एक अधिकारी करत असतो. या अधिकाऱ्यास प्रत्येक कर्मचारी काम योग्य प्रकारे आणि नेमून दिलेल्या वेळेत काम करतो की नाही हे पहावे लागते. अशी विविध प्रकारची कामे वरिष्ठ अधिकाऱ्यास एकाच वेळी करावी लागल्याने कामाचा बोजा वाढतो.

**२) निरंकुश नेतृत्व :**

रेषीय संघटनेत संपूर्ण उद्योगाची विभागणी विविध विभागात केलेली असते. प्रत्येक विभागाला विशिष्ट काम दिलेले असते. प्रत्येक विभागाचा एक वरिष्ठ अधिकारी असतो. तो त्या विभागाबाबत सर्व प्रकारचे निर्णय घेतो. त्याने घेतलेल्या निर्णयाची त्या विभागातील कर्मचाऱ्यांना कार्यवाही करावी लागते. त्याच्या निर्णयावर कोणीही नियंत्रण ठेवू शकत नाही.

**३) कनिष्ठ पातळीवरील पुढाकाराचा अभाव :**

प्रत्येक विभागात आणि स्तरावर काम करणाऱ्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारेच अधिकार नसतात. ते फक्त वरिष्ठांनी दिलेल्या आज्ञेचे पालन करू शकतात. कोणत्याही प्रकारचा निर्णय ते घेऊ शकत नाहीत. त्यामुळे कनिष्ठ पातळीवरील कर्मचारी कोणत्याही कामात पुढाकार घेत नाहीत. फक्त नेमून दिलेले काम करणे पसंत करतात.

**४) विशेषीकरणाचा अभाव :**

संपूर्ण विभागातील कामाची रचना अशाप्रकारे केलेली असते की, त्यावर निर्णय व नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी एकाच अधिकाऱ्यास दिलेली असते. विशिष्ट स्तरावर होणाऱ्या सर्व कामात एकच अधिकारी कुशल नसतो. सर्व विभागातील कामे एक व्यक्ती करु शकत नाही. नवीन बदल न स्विकारल्यामुळे विशेषीकरण झालेले नसते.

**५) वरिष्ठ अधिकाऱ्यावर अवास्तव परावलंबन :** या प्रकारच्या संघटनेत वरिष्ठ पदावर काम करणाऱ्या व्यक्तींवर कनिष्ठ स्तरावरील कामगार पूर्णपणे अवलंबून असतात. जोपर्यंत वरिष्ठ अधिकारी कोणताही निर्णय घेत नाही तोपर्यंत त्या कामाची कार्यवाहीही केली जात नाही. कोणत्याही कामाबाबत कनिष्ठ अधिकारी वरिष्ठ अधिकाऱ्यावर अवलंबून असतात.

**६) ताठरता :**

सर्व प्रकारच्या अधिकार आणि निर्णयाबाबत विशिष्ट चौकट ठरवलेली असते. त्या चौकटीचे उल्लंघन कोणीही करू शकत नाही. संघटनेचे यश काही ठराविक व्यक्तींवर अवलंबून असते. या व्यक्तींची संख्या मर्यादित असल्याने संघटनेचा विस्तार विशिष्ट मर्यादेपर्यंतच होतो.

**७) सांघिक व सहकार्यवृत्तीचा अभाव :**

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे, नेमून दिलेले काम करणे व त्यात कोणत्याही प्रकारचा बदल कनिष्ठ पातळीवरील अधिकारी करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे जीवन यांत्रिक बनते. ते एकसंध किंवा गट म्हणून परस्परांकडे पाहण्याचे टाळतात. तसेच त्यांच्यातील सहकार्याची वृत्ती ही हळूहळू लोप होते.

अशाप्रकारचे दोष रेषीय संघटनेत आढळतात. संघटना किंवा उद्योगाचे स्वरुप लहान असल्यास त्यातील कर्मचाऱ्यांची संख्या मर्यादित असल्यास आणि कामाचे स्वरुप साधे असल्यास रेषीय संघटना उपयुक्त ठरते.

**आपली प्रगती तपासा :**

१) रेषीय संघटनेचे गुण दोष सांगा.

**इ) रेषीय संघटनेचे उपप्रकार :**

रेषीय संघटनेचे दोन उपप्रकार पडतात. त्यांची माहिती आपण पाहू -

**१) साधे रेषीय संघटन:**

या प्रकारच्या संघटनेचे स्वरुप अत्यंत साधे असते. अधिकाराच्या वितरणात वा वाटपात कोणत्याही प्रकारची संदिग्धता किंवा गुंतागुंत नसते. अधिकारी व कामगार या दोन पदांचा समावेश असतो. त्यांचा परस्पर संबंध येतो. त्यामुळे सर्वोच्च पदावर असलेला अधिकारी आपले आदेश, सूचना किंवा इतर बाबी कामगारास प्रत्यक्ष बोलावून सांगतो. तसेच कामगारास कामाबाबत कोणतीही अडचण आल्यास तो वरिष्ठ अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष जाऊन त्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन घेतो. त्यामुळे त्यांना परस्परांबद्दल आपुलकी राहते. उद्योग वा संघटनेचे स्वरुप लहान असल्यास व त्यातील कर्मचाऱ्यांची संख्या पंधरापर्यंत मर्यादित असल्यास हा प्रकार यशस्वी होतो.

**२) संमिश्र रेषीय संघटन (विभागीय) :**

संघटनेच्या या प्रकारात संघटनेचे वा उद्योगाचे विविध विभागात विभाजन केले जाते. तसेच कामाची व अधिकारांची वाटणी केलेली असते. प्रत्येक विभागाचा एक प्रमुख व्यवस्थापक असतो आणि त्या सर्वांवर नियंत्रण ठेवणारा एक सर्वोच्च व्यवस्थापक असतो. सर्वोच्च व्यवस्थापकाला मिळालेले अधिकार आणि त्याने पार पाडायची जबाबदारी फार मोठी असते. त्या मानाने प्रत्येक विभागाच्या प्रमुख व्यवस्थापकास

मिळालेले अधिकार कमी असतात. सर्वोच्च पदावरील व्यवस्थापकाने दिलेले आदेश, सूचना आणि इतर बाबी कामगारांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्या त्या विभागाचा व्यवस्थापक करतो. सर्वोच्च व्यवस्थापक आणि कामगार यांच्यात कधीही प्रत्यक्ष संबंध येत नाही. त्यामुळे त्यांच्यात कोणत्याही स्वरुपाचे व्यक्तिगत संबंध प्रस्थापित होत नाहीत. संघटना किंवा उद्योगाचे स्वरुप विशाल असलयास अशा प्रकारची संरचना परिणामकारक आणि उपयुक्त पडते. तसेच अशा प्रकारच्या विभाजनामुळे उद्योग यशस्वी होण्यास मदत होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) रेषीय संघटनेचे उपप्रकार सांगा.

### २.५.२ कर्मचारी संघटन :

आधुनिक उद्योगात तांत्रिक बदल झपाट्याने होतात. आजचे तंत्रज्ञान भविष्यात उपयोगी पडेलच असे नाही. तंत्रशास्त्र, अर्थशास्त्र, कायदे आणि सामाजिक शास्त्रे यात नवीन ज्ञान, साधनसामुग्री यांची भर पडते. नवीन शोध आणि तंत्राचा परिणाम प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रितीने उद्योगावर होतो. उदा. व्यापार व्यवस्थापन, उत्पादन व बाजार इ. उद्योग क्षेत्रात नवीन शोधामुळे निर्माण होणाऱ्या बदलत्या परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी आणि उद्योगाची प्रगती टिकवून ठेवण्यासाठी विशेषज्ञांची गरज असते. यात तंत्रज्ञ, सामाजिक संशोधक व शास्त्रज्ञ, कायदेतज्ञ, व्यापारतज्ञ, अभियांत्रिकी तज्ञ इ. चा समावेश होतो. प्रत्येक उद्योगातील वरील प्रकारच्या विशेषज्ञांची नेमणूक व त्यांचे संघटन करणे म्हणजेच कर्मचारी संघटन होय.

**अ) कर्मचारी संघटनेची कार्ये:**

कर्मचारी संघटनेतील अधिकारी रेषीय संघटनेतील सदस्यांवर प्रत्यक्षपणे नियंत्रण ठेवत नाहीत. कर्मचारी संघटनेतील अधिकारी आपल्या व्यावसायिक व तांत्रिक ज्ञानाचा वापर करून रेषीय कर्मचाऱ्यांस योग्य सल्ला देतात. त्यांनी दिलेला सल्ला रेषीय अधिकाऱ्यास बंधनकारक नसतो. त्यांनी दिलेल्या सल्ल्याचा उपयोग उद्योगाची प्रगती करण्यासाठी होतो. ते विविध विषयांवर सल्ला देण्याचे काम करतात. उदा. नियोजन, कामाची पद्धती, संशोधन आणि विशिष्ट काम करण्यासाठी कोणते गुण वा योग्यता असणाऱ्या व्यक्तीची नियुक्ती करावी याबाबत सल्ला देतात. कर्मचारी संघटनेतील अधिकारी उत्पादनाशी प्रत्यक्षपणे संबंधित नसतात. ते उत्पादनाशी वा इतर घटकांसंदर्भात आवश्यक ती माहिती वेगवेगळया विभागांना पुरवतात. त्यांनी पुरविलेल्या माहितीचा उपयोग किती व कसा करायचा, याचे संपूर्ण स्वातंत्र्य रेषीय संघटनेतील अधिकाऱ्यांना असते.

**ब) रेषीय व कर्मचारी संघटनेतील संघर्ष:**

(१) रेषीय आणि कर्मचारी संघटनेत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामाची विभागणी अशाप्रकारे केलेली असते की, त्यात कर्मचारी संघटनेतील अधिकारी इतरांना सल्ला देण्याचे काम करतात. संशोधन, लेखाकामाबाबत अधिकाधिक अभ्यास

करून सल्ला देतात, तर रेषीय कर्मचाऱ्यास फक्त सामान्यपणे आदेश पाळणे, उत्पादन आणि वितरणाचे काम शिल्लक राहते.

(२) दोन्ही अधिकाऱ्यांनी एकत्रित येऊन परस्परांशी सल्लामसलत करून संघटनेचा विकास घडवून आणण्याचे उद्दिष्ट असते; परंतु वास्तवतः ते परस्परांना मदत न करता परस्परांना कमी लेखतात व तिरस्कार करतात. यामुळे त्यांच्यात मतभेद निर्माण होतात.

(३) रेषीय कर्मचाऱ्यांच्या मते, कर्मचारी संघटनेतील अधिकाऱ्यांमुळे रेषीय संघटनेचा दर्जा ढासळतो, ते पोकळ वा अवास्तव विचार करतात, संपूर्ण कामाचे श्रेय स्वतःला घेतात.

(४) कर्मचारी संघटनेच्या सदस्यांच्या मते, रेषीय संघटनेत निर्णय लवकर व प्रगल्भतेने घेतले जात नाहीत. त्यात दिरंगाई होते. ते परिवर्तनास तयार नसतात, त्याचा विरोध करतात, उपलब्ध साधनसामुग्री, प्रगल्भ विचार व कौशल्य यांचा योग्य वापर करू शकत नाहीत. विविध योजना आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचे टाळतात.

अशाप्रकारची मते दोन्ही प्रकारच्या संघटनेतील कामगारांमध्ये असल्याने त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) कर्मचारी संघटनेची कार्ये सांगा.

**क) रेषीय व कर्मचारी संघटनेतील संघर्षावरील उपाय :**

वरील दोन्हीमधील संघर्ष मिटविण्यासाठी दोन्हींच्या कामाच्या मर्यादा ठरवून द्याव्यात. कर्मचारी संघटनेतील व्यक्तींनी दिलेले सल्ले व सूचना योग्य रितीने अंमलात आणण्यासाठी रेषीय संघटनेतील कर्मचारी सुशिक्षित असावेत. संघटनेचे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी पूरक शिक्षण घेतलेले असावेत. संघटनेत बदल पूर्णतः घडून येत नाही, तो अंशतः घडतो याची जाणीव कर्मचारी संघटनेतील अधिकाऱ्यांना असावी. त्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले पाहिजेत. नवनवीन योजना तयार करून त्यांची कार्यवाही व्यवस्थापकाकडून होण्यासाठी त्याचा पाठपुरावा करावा. संघटनेतील सदस्यांना सतत प्रोत्साहन देत राहावे. कामगारांना काम करताना थकवा वाटणार नाही किंवा कंटाळा येणार नाही या दृष्टीने सतत प्रयत्न करावेत. दोन्ही संघटनेतील कर्मचाऱ्यांनी परस्परांशी चर्चा व विचार विनिमय करुन एक मताने कोणताही निर्णय घेतल्यास त्यांच्यात तंटा निर्माण होणार नाही. तसेच संशोधक वा तज्ञाने संघटनेत करायचा विकास व त्यासाठी करावे लागणारे बदल या सर्व गोष्टींची माहिती व्यवस्थापकाला समजेल, अशा भाषेत आणि वेगवेगळया पुराव्यांच्या आधारे द्यावी. यामुळे दोघांमधील तंटा मिटतोच पण त्याचबरोबर संघटनेचा विकास साधण्यासही मदत होते. यासाठी मानवी संसाधनाचे तंत्र संघटनेत आमलात आनणे महत्त्वाचे आहे.

### २.५.३ कार्यात्मक संघटन:

औद्योगिक संघटनेचा कारभार सुरळीतपणे चालण्यासाठी त्या संघटनेचे विविध विभागात विभाजन केले जाते. प्रत्येक विभागात विशिष्ट काम नेमून दिले जाते. प्रत्येक विभागामार्फत वेगवेगळी कार्ये पार पाडली जात असली तरी ते सर्व विभाग संघटनेच्या विकासासाठी प्रयत्नशील असतात. कामाची वाटणी केलेली असल्याने कोणत्याही प्रकारचा गोंधळ निर्माण होत नाही. कार्याबाबत प्रत्येक विभाग सतर्क राहतो. नेमून दिलेली कामे अधिक चांगल्या प्रकारे पार पाडतो.

**अ) कार्यात्मक संघटनाचा अर्थ:**

कोणताही उद्योग किंवा संघटना निर्माण झाली की तिची कार्यवाही योग्य रितीने पार पाडण्यासाठी वेगवेगळया संरचनांचा अभ्यास करून संघटनेच्या स्वरुपानुसार विशिष्ट संरचनेची निवड केली जाते. संघटना किंवा उद्योग मोठा असल्यास कार्यात्मक संघटनेची स्थापना केली जाते.

कार्यात्मक संघटना म्हणजे कार्य सुलभतेच्या दृष्टिकोनातून औद्योगिक संघटनेचे विविध विभागात विभाजन करणे होय.

या पद्धतीचा अभ्यास प्रथम एफ. टायलर यांनी केला. त्यांना रेषीय संघटनेत काही दोष आढळून आले होते. ज्या पद्धतीमुळे कोणत्याही निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणारी दिरंगाई तसेच सर्वोच्च व्यवस्थापक आणि कामगार यांच्यात न घडून येणारा संवाद वा प्रत्यक्ष संबंध वगैरे यांचा अभ्यास केला आहे.

कार्यात्मक संघटना ही विशेषीकरणावर आधारित असते. तसेच प्रत्येक विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि त्यांच्या खाली काम करणारे इतर कामगार कामाबाबतचे अंशतः निर्णय घेऊ शकतात. तसेच ते आपापल्या कामात कुशल असतात. त्यांचा आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष संबंध येतो. अधिकारी व कर्मचारी दोघेही आपापल्या विषयात निष्णात व कुशल असल्याने उद्भवलेल्या समस्यांचे निराकरण करू शकतात. अधिकाऱ्याने दिलेल्या हुकूमाची कार्यवाही ताबडतोब केली जाते. कार्यात्मक संघटनेत जे विविध विभाग पाडले जातात ते परस्परपूरक कामे करतात व एकमेकांवर अवलंबून असतात. उदा. हिशोब ठेवण्याचे काम लेखा विभागाकडे असते, मालाच्या उत्पादनावर देखरेख ठेवण्याचे काम उत्पादन विभागाकडे, बाजारात मालाची विक्री करण्याचे कार्य विक्री विभागाकडे सोपविलेले असते.

**ब) कार्यात्मक संघटनेचे फायदे:**

कार्यात्मक संघटनेत काम करणाऱ्या व्यक्तीच्या अंगी पुढील गुण असल्याने कामाची कार्यवाही योग्य रितीने होण्यास मदत होते. उदा. कुशल बुद्धी, शिक्षण, तांत्रिक ज्ञान, शारीरिक व मानसिक शक्ती, व्यवहार चातुर्य, कामाचा उत्साह, निर्णय घेण्याची क्षमता, चांगले आरोग्य व प्रमाणिकपणा इ. गोष्टींमुळे कार्यात्मक संघटनेचे पुढील फायदे होतात.

१) संघटनेतील प्रत्येक अधिकारी व कामगार आपापल्या कामात कुशल असल्याने संघटनेचा विकास घडून येण्यास मदत होते. तसेच त्यांनी कामाबाबतचे विशेष शिक्षण घेतले असते वा ते विशेषज्ञ असतात यामुळे त्यांच्या ज्ञान आणि अनुभवाचा फायदा होतो.

२) संघटनेची विभागणी वेगवेगळया स्तरावर व विभागात केलेली असते, प्रत्येकास विशिष्ट काम नेमून दिलेले असल्याने व त्यात कोणत्याही प्रकारची क्लिष्टता व संदिग्धता नसल्याने मोठ्या प्रमाणात उत्पादन निर्मिती होते.

३) या प्रकारच्या संरचनेत संशोधन आणि विकास अशी दोन्ही कामे एकाच वेळी पार पाडली जातात. म्हणजेच वेगवेगळे संशोधन करून त्याचा अवलंब केला जातो की ज्यायोगे संघटनेच्या विकासास हातभार लागतो.

४) वेगवेगळया विभागाची स्थापना करून विविध पदांची निर्मिती केली जाते. व्यक्तीच्या पात्रतेनुसार आणि क्षमतेनुसार त्या त्या पदावर कामगारांची नियुक्ती केली जाते.

५) कामगार ज्या प्रकारचे काम करतो त्यानुसार त्याचा मोबदला दिला जातो. प्रत्येक पदावर काम करणाऱ्या कामगाराला किती मोबदला द्यायचा याबाबत लिखित नियम असल्याने कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही.

६) या संघटनेतील प्रत्येक अधिकारी आपल्या विभागातील कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष संबंध ठेवतात. त्यांना कर्मचाऱ्यांच्या समस्यांची जाणीव असते व त्यामुळे ते समस्यांचे निराकरणही करतात. तसेच कर्मचाऱ्यांकडून अधिक तत्परतेने काम करून घेतात. त्यांना प्रोत्साहित करतात.

७) श्रम विभागणीच्या तत्त्वामुळे होणारे फायदे या प्रकारच्या संघटनेलाही प्राप्त होतात.

**क) कार्यात्मक संघटनेचे तोटे / मर्यादा :**

कार्यात्मक संघटनेमुळे जरी विविध फायदे संघटनेला प्राप्त होत असले तरी त्या पद्धतीचे काही तोटेही आहेत. ते पुढीलप्रमाणे -

१) दोन वेगवेगळया पातळयांवर काम करणाऱ्या कामगारांत कामाबाबत वाद होण्याची संभावना असते. तसेच कामाबाबत गोंधळ व मतभेद असतात. यामुळे निर्णयाची कार्यवाही होण्यास उशीर लागू शकतो.

२) काही वेळेस कामगारांना कामाबाबत निर्माण झालेल्या समस्या कोणाला सांगायच्या तसेच सल्ला कोणाचा घ्यायचा याबाबत शंका निर्माण होते.

३) कामाची विभागणी केलेली असल्याने निर्णय घेण्यास उशीर लागतो.

४) संघटनेच्या विकासाच्या दृष्टीने कामगारांना व अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात नाही. त्यामुळे भावी काळात संघटनेला योग्य नेतृत्त्व मिळू शकत नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) कार्यात्मक संघटनाचा अर्थ सांगून त्यांचे फायदे व तोटे सांगा.

### २.५.४ लंबाकृती संघटन:

या प्रकारच्या संघटनेत विविध स्तर तयार करून त्यांच्याकडे विविध विभाग सोपविले जातात. प्रत्येक विभागाचा एक व्यवस्थापक असतो. त्याच्या नियंत्रणाखाली पर्यवेक्षक काम करतात. हे पर्यवेक्षक संघटनेतील अधिकार व्यवस्थापकाने दिलेले आदेश पाळतात. ते आदेश आपल्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या कामगारांपर्यंत पोहोचवतात. त्या कामागारांची संख्या मर्यादित व कमी असते. पर्यवेक्षक प्रत्येकाशी व्यक्तिगत संबंध प्रस्थापित करून त्यांना उद्दिष्टपूर्तीसाठी प्रोत्साहित करत असतो. पर्यवेक्षकाचे कर्मचाऱ्यांवर सतत लक्ष असल्याने काही वेळेस कामगारांकडून चांगले काम होते, तर काही वेळेस त्यांच्यावर दडपण येऊ शकते.

### २.५.५ समस्तरीय संघटन:

या प्रकारात विविध विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या कामगारांची संख्या जास्त असते. उदा. चाळीस ते पन्नास. हे अधिकारी कामगारांवर नियंत्रण ठेवतात. तसेच या संघटन प्रकाराचे विभाजन दोन ते तीन पातळयांपर्यंतच केलेले असते. त्यामुळे वरिष्ठ पातळीवरील अधिकारी कनिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून शकतात. आपले निर्णय व आज्ञा कामगारांनाही देऊ शकतात. उद्दिष्टपूर्तीसाठी ते कामगारांना प्रेत्साहित करतात व कामगारांच्या समस्या व प्रश्न जाणून घेऊन त्याचे निराकरण करतात.

## २.६ सारांश

प्रत्येक संघटनेत किंवा उद्योगात संघटनेचे विविध स्तरावर व विभागात विभाजन केलेले असते. संघटनेचा कारभार सुलभ होण्याच्या दृष्टीने ही विभागणी केलेली असते. संघटनाचे मुख्यतः जे दोन प्रकार पडतात त्यातील औपचारिक संघटनेला विशेष महत्त्व असते. या संघटन प्रकाराचे नियम लिखित व अंशतः ताठर स्वरुपाचे असतात. औपचारिक संघटनेला संघटन प्रकारात महत्त्वाचे स्थान असले तरी अनौपचारिक संघटन प्रकारही तितकाच महत्त्वाचा आहे. संघटनात्मक संरचनेचे इतर काही प्रकार आहेत. त्यात रेषीय संघटन आणि कर्मचारी संघटन प्रकार महत्त्वपूर्ण आहेत. या संघटन प्रकारात विविध स्तरावर विभागलेले कार्याची माहिती दिली गेली आहे. हे संघटन प्रकार लहान उद्योगांसाठी महत्त्वपूर्ण ठरतो, तर कार्यात्मक संघटन प्रकार विशाल उद्योगांसाठी महत्त्वाचा असतो. व्यक्तीच्या पात्रता व क्षमतेनुसार कामाची विभागणी केलेली असते. संघटनेत विविध विभागाची रचना त्याचं्या कार्यानुसार केलेली असली तरी सर्व विभाग परस्परांशी निगडीत व परस्परावलंबी असलेले आढळतात. कार्याची विभागणी नेमकी केलेली असल्याने संघटनेचा विकास घडून येण्यास मदत होते. यामुळे संघटनात्मक संरचनेला विशेष महत्त्व प्रप्त झालेले आढळते.

## २.७ विद्यपीठीय प्रश्न

१) औपचारिक संघटनांचे महत्त्व, वैशिष्टये आणि मर्यादांची चर्चा करा.

२) रेषीय संघटन आणि कर्मचारी संघटनातील साम्य व फरकाची चर्चा करा.

३) कार्यात्मक संघटन सोदाहरण स्पष्ट करा.

४) संघटनेची गरज व महत्त्व विशद करा.

५) संघटनांची कार्ये कोणती ते सांगा.

६) संघटनांची मूलतत्त्वे स्पष्ट करा.

**२) टिपा लिहा:**

१) संघटना

२) संघटनाचे कार्ये

३) औपचारिक संघटना

४) औपचारिक संघटनेचे वैशिष्टये

५) लंबाकृती संघटन

६) समस्तरीय संघटन

❖❖❖❖

# ३

# अनौपचारिक संघटन अर्थ आणि औपचारिक संघटनेवरील परिणाम (INFORMAL ORGANIZATION)

**प्रकरण रचना :**

३.० उद्दिष्टये

३.१ प्रस्तावना

३.२ अनौपचारिक संघटना : अर्थ व व्याख्या

३.३ अनौपचारिक संघटनेची वैशिष्टये

३.४ अनौपचारिक संघटना अस्तित्वात येणारी कारणे

३.५ अनौपचारिक संघटनेची कार्ये

३.६ अनौपचारिक संघटनेचे महत्त्व व फायदे

३.७ अनौपचारिक संघटनेचे तोटे

३.८ औपचारिक संघटना व अनौपचारिक संघटना यातील संबंध व परिणाम

३.९ सारांश

३.१० शब्दार्थ

३.११ प्रश्न

## ३.० उद्दिष्टये

१. अनौपचारिक संघटना म्हणजे काय ते समजून घेणे.

२. कामगारांच्या हितांचे जतन करण्याचे मार्ग समजून घेणे.

३. कार्यक्षम संघटन कौशल्याचे ज्ञान मिळविणे.

४. मनुष्यशक्ती नैसर्गिक साधनसंपत्ती यांचा योग्य समन्वय साधण्याचे कौशल्य आत्मसात करण्याची माहिती करून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

उद्योग ही समाजाची एक महत्वाची व्यवस्था आहे. उद्योग क्षेत्रातील कामे यशस्वी रितीने पार पाडली जावीत म्हणून संघटनेची स्थापना करण्यात आल्या आहेत. औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिक उत्पादन वाढले. या नव्या उत्पादन पद्धतीमुळे उत्पादनाचा वेग वाढला व मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊ लागले. या उत्पादन पद्धतीचा मालक व कामगार यांच्या संबंधावरही दूरगामी स्वरूपाचे परिणाम झाले. पूर्वीच्या काळात मालक व कामगार यांच्यात प्रत्यक्ष संबंध होते. त्यामुळे त्यांच्यातील संघर्षाचे स्वरूप तीव्र स्वरूपाचे नव्हते. उलट सलोख्याचे संबंध असत. परंतु औद्योगिक उत्पादन पद्धतीमुळे उत्पादनाच्या साधनावर पूर्णत: मालक वर्गाची मालकी प्रस्थापित झाली. मालक व कामगार यांच्यात अप्रत्यक्ष स्वरूपाचे संबंध निर्माण झाले. कामगारांना आपल्या उपजीविकेच्या साधनांसाठी पूर्णत: मालक वर्गावर अवलंबून रहावे लागते. या परिस्थितीचा मालक वर्गाने गैरफायदा घेऊन कामगारांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक, शोषण सुरू केले. मालक व कामगार यांच्यातील संबंध संघर्षाचे, परस्पर विरोधाचे बनले. मालक व कामगार यांच्यातील संघर्षात व्यक्तिगत कामगार हा नेहमीच दुबळा ठरतो. अशा या कामगारांना जर न्याय द्यायचा असेल आणि मालक वर्गाच्या दडपशाहीला तोंड द्यावयाचे असेल तर संघटित होण्याची गरज आहे. यातूनच जाणीवपूर्वक व उत्स्फूर्तपणे औपचारिक आणि अनौपचारिक संघटना अस्तित्वात आल्या. त्या संघटनेमार्फत कामगार आपले हितसंबंध जोपासण्याचे कार्य करू लागले.

## ३.२ अनौपचारिक संघटनेचा अर्थ व व्याख्या

आधुनिक उद्योग व्यवसायात अनौपचारिक संबंध हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. हे संबंध उत्स्फूर्त म्हणजेच स्वयंप्रेरित असतात. औपचारिक संघटना ह्या विशिष्ट उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी मुद्दामहून स्थापन केल्या जातात, तर अनौपचारिक संघटना कोणत्याही स्थळी, कोणत्याही वेळेला कामगारांच्या आंतरक्रियांतून निर्माण होतात. औपचारिक संघटनेप्रमाणेच अनौपचारिक संघटनाही अत्यंत महत्त्वाच्या असतात. औपचारिक संघटनेपेक्षाही अनौपचारिक संघटना या संघर्षविरहित चांगले काम करू शकतात. म्हणून आधुनिक काळात औपचारिक संघटनेप्रमाणेच अनौपचारिक संघटनेचे महत्त्वही वाढत चालले आहे.

अनौपचारिक संघटना जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या नसून कार्यपूर्तीच्या उद्देशाने एकत्रित येऊन कामगार कल्याणासाठी सहज सर्व कामगार एकत्रित येऊन अनौपचारिक संघटना निर्माण करतात. त्यांच्यात एक समान ध्येय, उद्दिष्ट असते. समान संघटना निर्माण होतात. त्या संघटना कोणत्याही स्थळी, कोणत्याही वेळेला निर्माण होतात. त्या उत्स्फूर्त असतात. अनौपचारिक संघटनेत कोणतेही नीतिनियम, बंधने, कायदे नसतात. या संघटनेतील सभासद स्वयंप्रेरणेने स्वतःची जबाबदारी पार पाडतात. स्वयं-निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्याजवळ असते. कामगार स्वयंप्रेरणेने आपले काम प्रभावीपणे करीत असल्याने कामगारांची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे उत्पादन वाढते.

**अनौपचारिक संघटनेच्या व्याख्या :**

१) पी. गिलबर्ट यांच्या मते, “जरी अनौपचारिक संघटनांचे कार्य असले तरी ते आकस्मित नाही. यातील सामाजिक संबंध, संरचना आणि या संघटनाचे नेतृत्व हे सर्व उत्स्फूर्त असते.”

२) पीटर एम. ब्राऊन यांच्या मते, “एकेरी नावाचा उपयोग, वैयक्तिक संबंधाची प्रस्थापना, किरकोळ नियमांकडे दुर्लक्ष यामुळे कार्यकारी अधिकारी आपल्या कर्मचाऱ्यांकडून काही वेळेला विशेष कार्य करून घेऊ शकतो. त्यामुळे कोणत्याही प्रकल्पाच्या प्रगतीच्या दृष्टीने व्यक्तीच्या अनौपचारिक संबंधाकडे दुर्लक्ष करणे, त्यांना दुय्यम लेखणे किंवा हे संबंध नष्ट करण्याचा प्रयत्न करणे हितावह नसते.

३) अनौपचारिक औद्योगिक संघटनाची निर्मिती ही उत्स्फूर्त सामाजिक संबंधातून कोणत्याही वेळेला आणि कोणत्याही स्थळी व्यक्ती – व्यक्तीतील आंतरक्रियांतून सातत्याने होत असते.

अनौपचारिक संघटनेच्या वरील विविध व्याख्या लक्षात घेता असे म्हणता येईल की, अनौपचारिक संघटना ह्या अनियोजित असतात. त्यांची विशिष्ट अशी संरचना नसते. कोणाचेही वर्चस्व, दबाव व नियंत्रण नसते. त्या स्वयंप्रेरित, उत्स्फूर्त असतात. स्वतःहून जबाबदारी स्वीकारतात व ती योग्यपणे पारही पाडतात. त्यांनाच अनौपचारिक संघटना असे म्हणतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) अनौपचारिक संघटनेचा अर्थ व व्याख्या सांगा.

## ३.३ अनौपचारिक संघटनेची वैशिष्टये

**१) अनौपचारिक संघटना स्वयंपूर्ण असतात :**

अनौपचारिक संघटना जाणीवपूर्वक निर्माण केल्या जात नाहीत. अनौपचारिक संघटनाची निर्मिती उत्स्फूर्त सामाजिक संबंधातून कुठेही कधीही केली जाते. कामगारांच्या आंतरक्रियेमधून अनौपचारिक संघटना निर्माण होतात. अनौपचारिक संघटनेची विशिष्ट अशी संरचना नसते.

**२) अनौपचारिक संघटनेची निर्मिती समान उद्देशातून झालेली असते :**

उद्योगधंद्यात असणारे कर्मचारी समान छंद, रुची व अभिरुची असणारे असतात. ते सर्वजण एकत्र येऊन अनौपचारिक संघटना निर्माण होते. समान अभिरुची आणि उद्देश यांच्या पूर्ततेसाठी एकत्र येऊन संघटना निर्माण होतात. उदा. विविध उद्योगात निर्माण झालेली कामगारांची क्रीडा मंडळे, नाट्य मंडळे किंवा सांस्कृतिक मंडळे इ. चा अनौपचारिक संघटन होय.

**३) अनौपचारिक संघटनेचे स्वरूप प्राथमिक असते :**

समान छंद, अभिरुची असणारे एकत्रित येऊन अनौपचारिक संघटना स्थापन करतात. त्यांचा विस्तार कमी असल्यामुळे त्यांच्यामध्ये इतर औपचारिक संघटनेसारखे दुय्यम संबंध नसतात, तर प्राथमिक स्वरूपाचे आणि समोरासमोरचे संबंध निर्माण झालेले असतात. म्हणूनच अनौपचारिक संघटनेत आपलेपणा, जिव्हाळा, आत्मीयता असते. संघटनेतील व्यक्ती परस्परांशी वैयक्तिक संबंधांनी जोडलेले असतात.

**४) नियंत्रिकांचा/ नीतिनियमांचा अभाव :**

औपचारिक संघटना जाणीवपूर्वक निर्माण केल्या जातात. म्हणून या संघटनेची काही नीतिनियम, कायदे असतात. ते सर्व कायदे त्यांना पाळावेच लागतात. परंतु अनौपचारिक संघटना उत्स्फुर्तपणे निर्माण झालेल्या असल्याने त्यातील कामगारांमध्ये आपलेपणाचे बंध निर्माण झालेले असते. याच्यासाठी कायदे किंवा नीतिनियमांचे बंधन नसते. कोणाचेही वर्चस्व नसते. म्हणजेच अनौपचारिक संघटनेत नियंत्रणाचा प्रभाव विशेष जाणवत नाही.

**५) अनौपचारिक संघटना व्यक्तीसापेक्ष असतात :**

अनौपचारिक संघटनेतील कामगार कोणत्याही पदावरून न ओळखता कामगार एक व्यक्ती म्हणून ओळखला जातो. कामगारांची परस्पर वैयक्तिक संबंध निर्माण झालेले असतात. हे व्यक्तीसापेक्ष संबंध असतात. यामुळे संघटना संबंध अधिक परिपक्व होतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) अनौपचारिक संघटनेची वैशिष्टये सांगा.

## ३.४ अनौपचारिक संघटना अस्तित्वात येण्याची कारणे

१) अनौपचारिक संघटना अस्तित्वात येण्यासाठी कामगारांची एक समान गुण, छंद अभिरुची असणे आवश्यक आहे.

२) समान ध्येय उद्दिष्टय असते. ते ध्येय, उद्दिष्टय पूर्ण करण्यासाठी अनौपचारिक संघटनेची निर्मिती झालेली असते.

३) संप, टाळेबंदी सारखे विघातक कृत्य टाळण्यासाठी अनौपचारिक संघटना निर्माण झालेली असते.

४) कामगार व उद्योग यांच्यात सहकार्य निर्माण करण्यासाठी अनौपचारिक संघटना निर्माण करण्यात आल्या आहेत.

५) एकत्रित काम करीत असताना कामगारांमध्ये जवळीकता निर्माण झाल्याने उत्स्फूर्तपणे अनौपचारिक संघटनाची निर्मिती झाली.

६) कामगाराला एक प्रकारची सुरक्षितता प्राप्त व्हावी म्हणूनही अनौपचारिक संघटना निर्माण झाल्या आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) अनौपचारिक संघटना अस्तित्वात येण्याची कारणे सांगा.

## ३.५ अनौपचारिक संघटनेची कार्ये

### १) अनिश्चित अधिकार आणि जबाबदारी –

अनौपचारिक संघटनेत औपचारिक संघटनेप्रमाणे कामे ठरवलेली नसतात. तर या संघटनेतील सदस्यांना स्वतःहून स्वेच्छेने जबाबदारी स्वीकारावी लागते. अनौपचारिक संघटनेची विशिष्ट अशी संरचना नसते. त्यामुळे श्रेणीरचना नसते. कोणतेही विशिष्ट पद, पदभार नसतो. म्हणून जी जबाबदारी पार पाडावयाची तसे अधिकार दिले जातात. त्यानुसार आपली जबाबदारी योग्य पार पडण्याचे कार्य या संघटनेतील कामगारांना करावे लागते.

### २) गरजांची पूर्तता करणे –

अनौपचारिक संघटनेचे महत्त्वाचे कार्य म्हणजे कामगारांच्या गरजांची पूर्ती करणे. अनौपचारिक संघटनेतील कामगारांमध्ये प्राथमिक स्वरूपाचे संबंध निर्माण झालेले असतात. सहकार्य निर्माण झालेले असते. त्यातूनच कामगारांच्या गरजांची पूर्तता केली जाते. कामगारांच्या छोट्या – मोठ्या गोष्टीकडेही लक्ष दिले जाते व त्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न अनौपचारिक संघटनेमार्फत केले जाते.

### ३) कार्यक्षमता वाढविण्यासाठी -

अनौपचारिक संघटनेमार्फत कामगारांच्या कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. कामगारांवर अनौपचारिक संघटनेमार्फत कोणाचेही नियंत्रण नसते. त्यामुळे कामगार अगदी मोकळेपणाने स्वतंत्रपणे आपले कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे कामगारांच्या कार्यक्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढते.

### ४) कामगारांमध्ये एकवाक्यता / सहकार्य निर्माण करण्यासाठी –

अनौपचारिक संघटनेतील कामगारांमध्ये सहकार्य निर्माण करण्याचे कार्य या संघटनेमार्फत केले जाते. कारण या संघटनेतील कामगारांची संख्या कमी असते. या संघटनेचा विस्तार कमी असतो. आपोआपच या कामगारांमध्ये सहकार्याची भावना निर्माण होते. त्या सहकार्याच्या साह्यानेच या संघटनेतील कामगार गरजा, ध्येय, उद्दिष्टय पूर्ण करतो.

**५) सामाजिक दृष्टिकोन :**

अनौपचारिक संघटनेत तत्त्वप्रणालीचा अभाव असल्याने या संघटनेत मानवाच्या गरजांचा प्रथम विचार केला जातो. कामगारांच्या मूलभूत गरजा प्रथमत: लक्षात घेतल्या जातात. स्वतःपेक्षा इतरांचा विचार करण्याची प्रवृत्ती वाढण्यास मदत होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) अनौपचारिक संघटनेचे कार्ये सांगा.

## ३.६ अनौपचारिक संघटनेचे महत्त्व व फायदे

**१) प्रशासकीय कार्यास मदत :**

अनौपचारिक संघटनेमध्ये स्वयंप्रेरणेने कार्य केले जाते. कामगार स्वतःहून जबाबदारी पार पडतात आणि उत्स्फुर्तपणे काम करतात. कामगारांवर कोणाचेही नियंत्रण नसते. त्यामुळे कामगारांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. पर्यायाने प्रशासकीय कार्यास मदत होते.

**२) श्रमाचा सदुपयोग :**

अनौपचारिक संघटनेत कामगारांवर कशाचेही बंधन नसते. कोणतीही नियमावली नसते. कामगार आपल्या आवडीनिवडीनुसार श्रम करतात. जास्तीत जास्त उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच कामगार आपल्या श्रमाचा पुरेपूर उपयोग करून उत्पादन वाढविण्याचा प्रयतन करतात.

**३) निश्चित जबाबदारी :**

अनौपचारिक संघटनेमध्ये कोणतेही विशिष्ट संरचना नसते. कोणतीही श्रेणीरचना नसते. कामगारांना कोणतीही जबाबदारी दिलेली नसते. तरीही कामगार स्वतःचा आपली जबाबदारी स्वीकारून उत्पादन कार्यासंबंधी करावयाच्या कार्याच्या संदर्भात स्वयं मर्यादा निर्माण करून घेतात. हे उद्योगाच्या दृष्टिकोनातून फायदेशीर असते.

**४) व्यवसायाचा आकार वाढविणे :**

उद्योग क्षेत्राचा दिवसेंदिवस विस्तार होत आहे. अशावेळी अनौपचारिक संघटन महत्त्वाची गोष्ट आहे. कारण अनौपचारिक संघटनेतील कामगारांवर कोणतेही नियंत्रण नसल्याने तसेच कोणाच्याही आदेशाची वाट न पाहता निर्णय घेण्याची क्षमता निर्माण झालेली असते. वाढत्या उद्योगधंद्याच्या दृष्टिकोनातून अनौपचारिक संघटनेचे व्यवस्थापन फायद्याचे ठरते. त्यामुळे व्यवसायाचा आकार वाढविणे शक्य होते.

### ५) अधिकार प्रदान :

अनौपचारिक संघटनेत योग्य अशी संरचना नसल्याने कोणताही अधिकारी नेमला जात नाही, परंतु कामगार आपल्या कार्यक्षमतेचा/ कौशल्याचा वापर करून एक वेगळाच ठसा निर्माण करतात व उद्योग क्षेत्रात आपल्या गुण कौशल्याची झलक दाखवितात. त्यामुळे आपोआपच संघटनेकडून कामगारांना अधिकार प्रदान केले जातात. हा घटक कामगारांच्या दृष्टिकोनातून हिताचा आहे.

### ६) कार्यपूर्तता करणे :

व्यवस्थापनातील कार्यप्रणाली परिपूर्ण करण्याची जबाबदारी कामगाराने स्वयंप्रेरणेने स्विकारलेली असते. त्यामुळे व्यवस्थापनातील संपूर्ण कामे योग्य रितीने पार पाडण्यास अनौपचारिक संघटनेची प्रणाली फायदेशीर ठरते. कामगारांवर कोणतीही जबाबदारी स्विकारण्याची सक्ती केलेली नसते. ती जबाबदारी योग्य रितीने पार पाडण्यासाठी कामगार सतत कार्यरत राहतो. आपली जबाबदारी योग्य रितीने पार पडून कार्यपूर्तता करतो.

### ७) एकवाक्यता :

अनौपचारिक संघटना स्वयंप्रेरणेने निर्माण झालेली असते. त्यामुळे संघटनेच्या ध्येय आणि उद्देशाच्या एकवाक्यतेबद्दल मतभेद राहत नाही. यामुळे उत्पादनाच्या प्रक्रियेने सर्व कामगारात समानता प्रस्तापित करता येते. इतर औपचारिक संघटनेत श्रम विभागणीनुसार कामाची वाटणी केली गेलेली असते. कामगारांमध्येही मतभेद असतात. परंतु अनौपचारिक संघटनेत सहकार्याची भावना आढळते. त्यांच्यात समानता निर्माण झालेली दिसते. अनौपचारिक संघटनेतील कामगारांची आवडनिवड सारखीच असल्याने हे कामगार उत्स्फुर्तपणे एकत्रित येतात. त्यांच्यात आपलेपणा निर्माण झालेला असतो. त्यामुळेच अनौपचारिक संघटनेतील कामगारांमध्ये एकवाक्यता निर्माण होते.

### अनौपचारिक संघटनेचे फायदे :

१) अनौपचारिक संघटना ही उत्स्फूर्त असल्याने या संघटनेतील कामगारांवर कोणतेही नियंत्रण नसते. त्यामुळे कामगार स्वतंत्रपणे आनंदाने आपले काम करतो.

२) अनौपचारिक संघटनेतील कामगारांवर कोणत्याही व्यक्तीचा दबाव नसतो. त्यामुळे काम करताना त्यांना दडपण येत नाही. त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. त्यांची कार्यक्षमता वाढते. परिणामी उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे आर्थिक विकास होतो.

३) अनौपचारिक संघटना ही कामगार व मालक यांच्यात समन्वय घालण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे संप, टाळेबंदी सारखे विघातक प्रकार टाळू शकतात. समन्वयामुळे मालक व कामगारातील संबंध टाळण्यास मदत होते.

४) अनौपचारिक संघटनेतील कामगारामध्ये एकता दिसून येते. त्यांच्यात आपलेपणा, जवळीक निर्माण झालेली असते. सर्व कामगारांचे प्रश्न समस्या सोडविण्यासाठी सर्वजण एकत्रितरित्या प्रयत्न करतात.

५) अनौपचारिक संघटनेमध्ये विशिष्ट अशी संरचना, श्रेणीरचना नसल्याने अनौपचारिक संघटनेतील सर्वांना समान दर्जा, प्रतिष्ठा दिली जाते. अनौपचारिक संघटनेतील कामगारांमध्ये श्रेष्ठ- कनिष्ठत्वाची भावना नसते.

६) अनौपचारिक संघटनेत कामगारांवर कोणत्याही व्यक्तीचे आदेश पाळण्याचे बंधन नसते. कामगार स्वतः निर्णय घेऊ शकतो. कामगारांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता असते. तो निर्णय तत्परता दाखवू शकतो.

७) अनौपचारिक संघटनेतील कामगार आपला फुरसतीचा/ रिकामा वेळ सत्कारणी लावतात. त्या रिकाम्या वेळेचा योग्य तो उपयोग करून घेतात. “रिकामे डोके सैतानाचे घर” म्हणून कामगार सतत कार्यरत राहण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे कामगारांमध्ये विध्वंसक वृत्ती कमी होऊन सामाजिक वृत्ती वाढण्यास मदत होते.

८) औपचारिक संघटनेत कामावरून कमी करण्याची भीती कामगारांना सतत वाटत असते. याउलट अनौपचारिक संघटनेतील मानसिक व भावनिक सुरक्षितता मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

१) अनौपचारिक संघटनेचे महत्त्व व फायदे सांगा.

## ३.७ अनौपचारिक संघटनेतील तोटे

१) अनौपचारिक संघटनेमध्ये विशिष्ट अशी संरचना नसते. म्हणून या संघटनेतील व्यवस्थापक चतुरस्त्र असला पाहिजे. नाही तर संघटनेचे विघटन होण्याची शक्यता असते.

२) संघटना अनौपचारिक असल्याने या संघटनेतील कामगारांसाठी कोणतेही नीतिनियम नसतात. स्वयंशिस्त बाळगावी लागते. शिस्तीचा अवलंब न केल्यास गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते.

३) अनौपचारिक संघटनेमध्ये जास्तीत जास्त मानवी बाजूंचाच विचार केल्यामुळे तांत्रिक बाजूकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. त्याचा परिणाम उद्योगधंद्यावर होतो.

४) अनौपचारिक संघटनेमध्ये श्रेणीरचना नसल्याने कामगारांवर कोणत्याही व्यक्तीचे नियंत्रण नसते. कोणाचेही आदेश पाळण्याचे बंधन नसते. अशा वेळेस कामगार मन मानेल तसे वागण्याचा धोका असतो.

## ३.८ औपचारिक व अनौपचारिक संघटना यातील संबंध

अनौपचारिक संघटन अर्थ औपचारिक संघटनेवरील परिणाम

| औपचारिक संघटना (Formal Organization) | अनौपचारिक संघटना (Informal Organization) |
|---|---|
| १)दोन किंवा अधिक व्यक्तींची क्रिया किंवा शक्ती यांचा जाणीवपूर्वक घडवून आणणारी प्रक्रिया | १)अनौपचारिक संघटनांची निर्मिती ही उत्स्फूर्त सामाजिक संबंधातून झालेली असते. |
| २)औपचारिक संघटन व्यक्तीनिरपेक्ष असते. उदा. एखादा अधिकारी किंवा कामगार निवृत्त झाला की त्यांची जागा दुसरा अधिकारी किंवा कामगार होतो. कोणावरही कसलाही परिणाम होत नाही. | २)अनौपचारिक संघटन व्यक्तीसापेक्ष असते. कामगार वैयक्तिक संबंधाने जोडले गेलेले असतात. त्यामुळे संघटनेवर त्याचा परिणाम होतो. त्या कामगाराची जागा कोणीही भरून काढू शकत नाही. |
| ३)व्यक्ती-व्यक्तीचे संबंध जाणीवपूर्वक निर्माण केलेले असतात. कामगाराचे संबंध कशा प्रकारचे असावेत, याविषयी विशिष्ट असा आराखडा तयार केलेला असतो. | ३) कामगारांच्या उत्स्फूर्त संबंधातून ही संघटना निर्माण झालेली आहे. या संघटनेतील कामगारांचे संबंध प्राथमिक समूहासारखे असते. या संबंधाबाबत कोणताही आराखडा नसतो. |
| ४)औपचारिक संघटनेतील कामगारांवर वरिष्ठांचे नियंत्रण असते. वरिष्ठाने दिलेले आदेश पाळावे लागतात. या संघटनेतील कामगारांना निर्णय घेण्याचा अधिकार नसतो. | ४) अनौपचारिक संघटनेत विशिष्ट श्रेणीरचना नसल्याने या संघटनेतील कामगारांना कोणाचेही आदेश पाळावे लागत नाही, तर निर्णय घेण्याचा अधिकार असतो. |
| ५)औपचारिक संघटनेमध्ये विविध स्तर, पातळ्या असतात. उदा. अध्यक्ष, संचालक, कार्यकारी तंत्रज्ञ, पर्यवेक्षक, फोरमन, कामगार या सर्वांची वेगवेगळी स्तररचना असते. त्या स्तररचनेवरून त्यांना आपली जबाबदारी पार पाडावी लागते. | ५)अनौपचारिक संघटनेत कोणतीही श्रेणी किंवा स्तर नसतात. मर्यादित व्यक्तींचाच यात समावेश असतो. या संघटनेतील व्यक्ती एका विशिष्ट धाग्याने जोडले गेलेले असतात. उदा. एखाद्या कारखान्यातील कवी एकत्र येऊन 'कवी क्लब' स्थापन करतात. अशाप्रकारे नाट्य मंडळ, सांस्कृतिक मंडळ स्थापन केले जाते. |

| | |
|---|---|
| ६)औपचारिक संघटनेतील कामगारांचे जीवन चाकोरीबद्ध असते. या संघटनेतील कामगारांना शिस्त अत्यंत आवश्यक असते. | ६)अनौपचारिक संघटनेतील कामगारांचे जीवन चाकोरीबद्ध नसते. शिस्तीचे पालन केले जाते. |
| ७)औपचारिक संघटनेतील कामगारांना कामावरून कमी करण्याची भीती असते. भावनिक सुरक्षितता नसते. | ७)अनौपचारिक संघटनेतील कामगारांना कामावरून कमी करण्याची भीती नसते. |
| ८)व्यवस्थापक व्यवस्थेसाठी चांगल्या प्रकारे नियोजनात्मक वापर आवश्यक | ८)आधुनिक काळात अनौपचारिक संघटना अत्यंत आवश्यक |

**आपली प्रगती तपासा :**

१) औपचारिक व अनौपचारिक संघटना यातील फरक स्पष्ट करा.

## ३.८ अनौपचारिक संघटनेचा औपचारिक संघटनेवरील परिणाम

एका ठिकाणी एकत्रितपणे काम करणाऱ्या कामगारांच्या परस्पर संबंधातून अनौपचारिक संघटना निर्माण झालेली असते. औपचारिक संघटनेपेक्षा अनौपचरिक संघटना ही प्रभावी आणि महत्त्वाची ठरते. अनौपचारिक संघटनेच्या व्यवस्थापनाचा कामगारांच्या कार्यक्षमतेवर निश्चितचा चांगला परिणाम होत असतो. कामगारांमध्ये सहकार्याची भावना वाढून, एकी निर्माण होते. मतभेद कमी होतात. सहकार्याने काम करण्याची प्रवृत्ती वाढते. त्याचा परिणाम उत्पादकतेवर होतो. उद्योगधंद्यातील कामगारांच्या अनेक समस्या असतात. वैयक्तिक, सामाजिक, भावनिक अशा अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या असतात. त्या समस्यांचे निराकरण अनौपचारिक संघटनेद्वारेच करणे शक्य होते. कोणत्याही संघटनेची विशिष्ट अशी उद्दिष्टे असतात. ती उद्दिष्टे कामगारांच्या मार्फतच पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. तेथील काम करणाऱ्या व्यक्तीच्या माध्यमातूनच साध्य केली जातात. कामगारांच्या आर्थिक प्रेरणा, प्रभावी दळणवळण व्यवस्था, व्यवस्थापकांचे नेतृत्व, प्रशिक्षण, कर्मचाऱ्यांमधील परस्पर संबंध, कर्मचाऱ्यांचा व्यवस्थापनातील सहभाग इ. विविध गोष्टींवर व्यवसायाचे यशापयश अवलंबून असते.

अनौपचारिक संघटनेप्रमाणे औपचारिक संघटनेमध्येदेखील बदल होत आहे. ज्याप्रमाणे अनौपचारिक संघटनेवर कोणाचेही नियंत्रण, दबाव नसतो. त्याचप्रमाणे औपचारिक संघटनेवरही नियंत्रणविरहित रचना राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. जेणेकरून संघटनेमध्ये आनंदी, सहकार्याचे संबंध निर्माण होतील. मोकळेपणा, निर्णय घेण्याचा अधिकार इ. गोष्टीचा वापर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मालक व कामगार यांच्यात समन्वय साधून आपआपसातील मतभेद कमी करून उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. व्यवस्थापन टिकविण्यासाठी संघटना सुदृढ असणे गरजेचे असते.

त्यामुळे मालक व कामगार या दोन्ही वर्गाला त्याचा फायदा होतो. आर्थिक उत्पादन वाढते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. जेवढे मनमोकळे वातावरण तेवढी कामगारांची कार्यक्षमता वाढते.

**आपली प्रगती तपासा :**

१) अनौपचारिक संघटनेचा औपचारिक संघटनेवरील परिणाम सांगा.

## ३.९ सारांश

औद्योगिक क्रांतीनंतर जगभर अनेक यंत्रावर आधारित उद्योगधंदे निर्माण झालें. या उद्योगधंद्यामध्ये श्रम करणारा वर्गही वाढला. कामगार वर्गाची पिळवणूक केली जाऊ लागली. ही पिळवणूक किंवा कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी कामगार संघटित होऊन आपल्या समस्या सोडवू लागले. त्या संघटनेतून औपचारिक व अनौपचारिक संघटना निर्माण झाल्या. मुद्दामहून जाणीवपूर्वक निर्माण केलेली आणि स्वयंस्फूर्तीने निर्माण झालेली संघटना म्हणजे अनौपचारिक संघटना होय. अनौपचारिक संघटनेतील कामगारांचे उद्देश, ध्येय एक असते. समान ध्येय, आवड, रुची असणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन अनौपचारिक संघटना निर्माण करतात. समान ध्येय असल्यामुळे त्या संघटनेतील कामगारांमध्ये आपलेपणा, जिव्हाळा निर्माण झालेला असतो. त्यामुळे कामगारांमध्ये एक प्रकारचा मनमोकळेपणा निर्माण झालेला असतो. त्या सर्व गोष्टीचा कामगारांच्या कार्यक्षमतेवर चांगला परिणाम होतो. कामगारांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी अनौपचारिक संघटनेचे वातावरण, व्यवस्थापन कारणीभूत ठरते. अनौपचारिक संघटनेवरील कामगारांवर कोणाचेही नियंत्रण नसते. त्यामुळे कामगारांवर दडपण नसल्याने ते कोणत्याही व्यक्तीच्या आदेशाची वाट न पाहता स्वनिर्णय घेतो. त्याच्यामध्ये निर्णय तत्परता असते. आपल्या गुणकौशल्याचा वापर करून संघटनेतील कामगार उत्पादन वाढविण्यावर तसेच कामगारांच्या समस्या, प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात.

## ३.१० शब्दार्थ

अनौपचारिक – सहज संबंधातून निर्माण झालेले.

औपचारिक – मुद्दामहून जाणीवपूर्वक निर्माण केलेले.

## ३.११ प्रश्न

१) अनौपचारिक संघटनेची व्याख्या सांगून तिची वैशिष्टये स्पष्ट करा.

२) अनौपचारिक संघटना अस्तित्वात येण्याची सविस्तर कारणे सांगा.

३) अनौपचारिक संघटना व औपचारिक संघटना यातील फरक स्पष्ट करा.

४) अनौपचारिक संघटनेचे विविध कार्ये स्पष्ट करा.

५) अनौपचारिक संघटनेचे महत्त्व व फायदे सांगा.

६) अनौपचारिक संघटना व औपचारिक संघटना यातील संबंध व परिणाम स्पष्ट करा.

७) टिपा लिहा.

   १) औपचारिक व अनौपचारिक संघटन

   २) अनौपचारिक संघटनेची वैशिष्ट्ये

   ३) अनौपचारिक संघटना अस्तित्वात येण्याची कारणे

   ४) अनौपचारिक संघटनेची कार्ये

   ५) अनौपचारिक संघटनेचे तोटे

❖❖❖❖

# ४

# संघटनात्मक नियोजन

**प्रकरण रचना**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ संघटनात्मक नियोजनाचे महत्त्व

४.३ संघटनात्मक नियोजनावर परिणाम करणारे घटक

४.४ मागणी अंदाज

४.५ पुरवठा अंदाज

४.६ निष्कर्ष

४.७ सारांश

४.८ प्रश्न

४.९ संदर्भ


## ४.० उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांना संघटनात्मक नियोजन, मागणी आणि पुरवठा अंदाज या संकल्पनेची ओळख करून देणे.
२) संघटनात्मक नियोजनाचे महत्त्व समजून घेणे.
३) संघटनात्मक नियोजन प्रक्रियेतील त्रुटी समजून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

संस्थेच्या अल्प आणि दीर्घकालीन उद्दिष्टांची ओळख, तसेच ते साध्य करण्यासाठी तपशीलवार योजना तयार करणे आणि त्यांचे निरीक्षण करणे, संस्थात्मक प्रक्रिया तयार करते.

मानव संसाधन नियोजन (HRP) किंवा मनुष्यबळ नियोजन ही अशी पद्धत आहे, जी योग्य संख्या आणि कर्मचारी योग्य वेळी, योग्य ठिकाणी उपस्थित असल्याची खात्री देते, ती कर्तव्ये यशस्वीपणे आणि कार्यक्षमतेने पार पाडण्यास सक्षम असतात जी संस्थेला तिचे ध्येय साध्य करण्यात मदत करतात. स्टेनरच्या मते, "मनुष्यबळ नियोजन" हे "संपादन, उपयोग, वाढीसाठी एक उपयुक्त धोरण आहे.

## ४.२ संघटनात्मक नियोजनाचे महत्त्व

संघटनात्मक नियोजन मानवी संसाधनांचे योगदान वाढवण्याच्या उद्देशाने योजना तयार करून, मानवी संसाधन नियोजन संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठीची क्षमता टिकवून ठेवण्याचा आणि वाढवण्याचा प्रयत्न करते.

१. भरतीच्या स्तरांचे मूल्यमापन करणे.

२. टाळेबंदीचा अंदाज लावणे आणि अनावश्यक निलंबनाला प्रतिबंध करणे.

३. आदर्श प्रशिक्षण स्तर स्थापित करणे.

४. व्यवस्थापन विकास कार्यक्रमासाठी पाया म्हणून काम करणे.

५. भविष्यातील प्रकल्पांसाठी कामगारांचा पुनर्वापर करणे.

६. उत्पादकता संदर्भात वाटाघाटी करण्यासाठी मदत करणे.

७. संभाव्य समस्या ओळखण्यात संस्थेला मदत करणे.

८. ओव्हरहेड किंमत आणि सेवा कार्यांचे मूल्य तपासणे.

९. काही क्रियाकलाप बाह्य मदतीने केले जावेत किंवा नाही हे निर्धारित करणे.

## ४.३ मानव संसाधन योजनेवर परिणाम करणारे घटक

मानव संसाधन कार्यक्रम (HRP) प्रभावित करणारे अनेक घटक आहेत. हे घटक बाह्य घटक आणि अंतर्गत घटक अशा दोन घटकांमध्ये वर्गीकृत केले जाऊ शकतात.

**(अ) बाह्य घटक:-**

**१. सरकारी धोरणे:-** सरकारी धोरणे उदा. कामगार धोरण, औद्योगिक संबंध धोरण आणि विशिष्ट समुदायांसाठी विशिष्ट रोजगार राखून ठेवणारी धोरणे यांचा मानव संसाधन कार्यक्रमावर परिणाम होतो.

**२. आर्थिक विकासाची पातळी:** आर्थिक विकासाची पातळी देशातील मानव संसाधन विकासावर परिणाम करते आणि तसेच भविष्यात मानवी संसाधनांच्या पुरवठ्यावर परिणाम करते.

**३. व्यवसाय पर्यावरण:** बाह्य व्यवसाय पर्यावरणीय घटक उत्पादन खंड आणि मिश्रणावर परिणाम करतात.

**४. माहिती तंत्रज्ञान :** माहिती तंत्रज्ञानाने व्यवसाय चालवण्याची पद्धत बदलली आहे. व्यवसाय प्रक्रिया अभियांत्रिकी, व्यवसाय संसाधन नियोजन आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन ही या बदलांची उदाहरणे आहेत. या घडामोडींमुळे पारंपरिक मानवी संसाधनांची ऐतिहासिकदृष्ट्या कमी पातळी आणि सॉफ्टवेअर व्यावसायिकांमध्ये वाढ

झाली. तथापि, या सुधारणांमुळे नंतर सॉफ्टवेअर व्यावसायिकांची गरज कमी झाली. याव्यतिरिक्त संगणक सहायित तंत्रज्ञानाने सध्याचे मानवी संसाधन कमी केले.

५. **तंत्रज्ञान पातळी:** तंत्रज्ञानाची पातळी मानवी संसाधनांच्या प्रकारावर परिणाम करते.

६. **आंतरराष्ट्रीय चल:** विविध राष्ट्रांमधील मानवी संसाधनाची मागणी आणि पुरवठा यासारखे आंतरराष्ट्रीय घटक मानव संसाधनावर परिणाम करीत असतात.

**(ब) अंतर्गत घटक:-**

१. **कंपनीची उद्दिष्टे:** कंपनीची उद्दिष्टे आणि धोरणे यांचा विस्तार, विविधीकरण, भागीदारी इ. चा मानवी संसाधनांच्या मागणीची गुणवत्ता आणि प्रमाण यावर परिणाम होतो.

२. **मानव संसाधन धोरणे:** मानवी संसाधनाची गुणवत्ता, पगाराची पातळी, कामाच्या ठिकाणाची परिस्थिती, दैनंदिन जीवन गुणवत्ता, कंपनीची मानवी संसाधने धोरणे इ. चा मानवी संसाधन धोरणावर परिणाम होतो.

३. **नोकरीचे विश्लेषण:** मानवी संसाधन धोरण हे मूलभूतपणे नोकरीच्या विश्लेषणावर आधारित असते. कंपनीला कोणत्या प्रकारचे कर्मचारी आवश्यक आहेत? त्याचे तपशील आपल्याला नोकरीच्या विश्लेषणातून समजते.

४. **दीर्घकालीन विचार :** स्थिर स्पर्धात्मक वातावरणातील व्यवसाय दीर्घकालीन योजना आखतील, तर अस्थिर स्पर्धात्मक वातावरणातील कंपन्या केवळ अल्प मुदतीसाठीच तयारी करू शकतात.

५. **माहितीचा प्रकार आणि गुणवत्ता:** कोणत्याही नियोजन प्रक्रियेसाठी गुणात्मक आणि अचूक माहिती आवश्यक असते. हे विशेषतः मानव संसाधन योजनांसाठी आवश्यक असते.

| बाह्य घटक | अंतर्गत घटक |
|---|---|
| सरकारी धोरणे | कंपनीची रणनीती |
| मानव संसाधनाच्या भविष्यातील पुरवठ्यासह आर्थिक विकासाचा स्तर | कंपनीचे मानव संसाधन धोरण |
| व्यवसाय वातावरण | औपचारिक आणि अनौपचारिक गट |
| माहिती तंत्रज्ञान | नोकरी विश्लेषण |
| तंत्रज्ञानाची पातळी | दीर्घकालीन विचार |
| नैसर्गिक घटक | माहितीचा प्रकार आणि गुणवत्ता |
| आंतरराष्ट्रीय घटक | कंपनीचे उत्पादन / ऑपरेशन धोरण |
| | ट्रेड युनियन |

औद्योगिक क्षेत्रात विशेषतः तंत्रज्ञ व यंत्रचालकांना विशेष कौशल्य व ज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते. वैयक्तिक क्षमता व कौशल्याच्या आधारे औद्योगिक क्षेत्राची पर्यायाने राष्ट्राची प्रगती साधली जाते. शिक्षणातील विशेष असे प्रशिक्षण घेऊन कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. आधुनिक काळात व्यवसायात किंवा कोणत्याही क्षेत्रात टिकून राहण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते. विशिष्ट असे कौशल्य मिळविणे म्हणजे प्रशिक्षण होय. कोणताही पेशा यशस्वीपणे करण्यासाठी त्या त्या ज्ञानशाखेचा अभ्यास म्हणजे प्रशिक्षण होय.

औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशात कोणताही पेशा स्वीकारावयाचा असल्यास त्यातील ज्ञान, कौशल्य व अनुभव घेण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते. व्यवसायातील विविध गरजांची पूर्तता करण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक असते. २१ व्या शतकात अभियांत्रिकी, तांत्रिक अशा प्रकारच्या शिक्षणाच्या व प्रशिक्षणाच्या असंख्य शाखा विकसित झाल्या आहेत. या व्यतिरिक्त वैद्यकीय, व्यवस्थापन, शिक्षकी पेशा, लष्करी पेशा, अभिनय, संगीत, संगणक, माहिती तंत्रज्ञान व स्थापत्य अशा अनेक व्यवसायासाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची आवश्यकता असते. म्हणून आज प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था निर्माण झाल्या आहेत.

**शिक्षणाची संकल्पना:**

शिक्षण हे मानवी जीवनाचे प्रमुख अंग आहे. मानवी जीवनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. शिक्षणानेच मानवातील पशुत्वावर मात करता येते. मानवास अंधारातून प्रकाशाकडे शिक्षणच नेते. प्रत्येक मानवाच्या अनेक गरजांपैकी प्रमुख गरज म्हणजे शिक्षण होय. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षण घेण्याची उर्मी प्रत्येक व्यक्तीत उपजतच असते. या उर्मीला योग्य वातावरण लाभले की व्यक्ती शिक्षित होते. व्यक्तीचे शिक्षण शाळा, महाविद्यालयात संपत नाही तर ते जीवनभर चालू असते. सभोवतालच्या सामाजिक, भौतिक परिसर आणि व्यक्ती यांच्यात सतत आंतरक्रिया चालू असते. या आंतरक्रियांमधून व्यक्तीला अनुभव मिळतो. या अनुभवातून व्यक्ती सतत आपल्या वर्तनात बदल करतो. ते म्हणजे शिक्षण होय. व्यक्ती विकास आणि पर्यायाने समाज विकास म्हणजे शिक्षण होय. यात व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील सर्व अंगांचा सर्वांगीण व समतोल विकास समाविष्ट आहे. हा विकास व्यक्तीच्या जन्मापासून तिच्या मृत्यूपर्यंत चालूच असतो. व्यक्तीचा विकास ज्ञानात्मक, भावनात्मक व क्रियात्मक पातळीवर घडून येतो. "शिक्षण म्हणजे व्यक्तीचा हेतूपूर्वक घडवून आणलेला सर्वांगीण विकास होय."

**विकासाची संकल्पना:**

विकास ही संकल्पना उन्नतशील परिवर्तनाशी संबंधित आहे. समाजाच्या विविध क्षेत्रात इच्छित, अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी हेतुपुरस्सरपणे प्रयत्न व त्यातून समाजाची उन्नती म्हणजे विकास होय. विशेषतः आर्थिक क्षेत्रात विकास ही संकल्पना सातत्याने वापरली जाते. उत्पादनाच्या क्षेत्रात होणारी गुणात्मक वाढ म्हणजेच आर्थिक विकास होय. तर समाजातील त्रूटी दूर होऊन समाजाची होणारी गुणात्मक वाढ म्हणजे सामाजिक विकास होय. समाजाची धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील गुणात्मक वाढ म्हणजे त्या समाजाचा सर्वांगीण विकास होय. शिक्षण, प्रशिक्षणाने होणारी समाजाची नावीन्यपूर्ण जबरदस्त वाढ म्हणजे विकास होय. शिक्षण व प्रशिक्षणाने समाजातील संरचनेत असे परिवर्तन की ज्याला विकास असे म्हणता येईल. विकासाची संकल्पना ही व्यापक आहे. यावरून असे म्हणता येईल की, शिक्षण, प्रशिक्षण आणि विकास यांचा घनिष्ट संबंध आहे. शिक्षण - प्रशिक्षणावर समाजाचा, पर्यायी राष्ट्राचा विकास अवलंबून आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रशिक्षण, शिक्षण आणि विकासाची संकल्पना स्पष्ट करा.

## ६.३ प्रशिक्षणाचा अर्थ आणि व्याख्या

१) एल.डी.ब्रॅण्डीस यांच्या मते, " पेशा हे असे क्षेत्र होय की, ज्यासाठी बौद्धिक स्वरुपाच्या प्रशिक्षणाची आवश्यकता असते. ज्या क्षेत्रात प्रवेश करण्यामागे सेवावृत्ती ही महत्त्वाची मानली जाते आणि यश हे आर्थिक दृष्टिकोनातून मोजले जात नाही."

२) प्रा. बोराडे एस. एन. यांच्या मते, "विशिष्ट असे कौशल्य प्राप्त करून घेण्यासाठी अनुभव मिळविणे म्हणजेच प्रशिक्षण होय."

३) "कोणत्याही क्षेत्रात उत्कृष्ट ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी संपादन केलेले शिक्षण म्हणजे प्रशिक्षण होय."

४) "कोणताही पेशा यशस्वीपणे करण्यासाठी त्या त्या ज्ञानशाखेचा अभ्यास म्हणजे प्रशिक्षण होय."

औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशात कोणताही पेशा स्वीकारावयाचा असल्यास त्यातील ज्ञान, कौशल्य व अनुभव घेण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक असते.

कर्मचारी किंवा कामगार किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात काम करणारी व्यक्तीला आपल्या कामाला उजाळा देण्यासाठी त्या घटकाच्या प्रशिक्षणाची गरज असते.

कामामध्ये कौशल्य प्राप्त करण्यासाठी व्यक्तीला प्रशिक्षणाची गरज असते. पूर्वी चूका व शिका ही पद्धत अस्तित्त्वात होती. परंतु बदलल्या परिस्थितीनुसार ही पद्धत मोडीत निघाली आणि आज प्रशिक्षित कामगारांची उद्योगधंद्यास नितांत गरज भासू लागली. त्यासाठी अनेक संस्था, शाळा, महाविद्यालय, औपचारिक, अनौपचारिक संस्था निर्माण झाल्या. यातून प्रशिक्षित कामगार, कर्मचारी यांच्या कामाला प्रशिक्षणाद्वारे उजाळा दिला जातो व नंतर कामगार नव्या कार्यक्षमतेने आपले काम करतो.

प्रशिक्षणाने व्यक्ती विकास होतो. पर्यायाने उत्पादनात वाढ होते. आर्थिक विकास होऊन राष्ट्रीय विकास होण्यास मदत होते. प्रशिक्षणामुळे काम करण्याची सुयोग्य पद्धत कर्मचाऱ्यांना समजते.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रशिक्षणाचा अर्थ आणि व्याख्या सांगा.

## ६.४ प्रशिक्षणाचे महत्त्व

उद्योगधंद्यातील निरनिराळ्या विभागांचे कामकाज नियमितपणे व सुरळीतपणे चालण्यासाठी पुरेशा प्रमाणात व योग्य पात्रतेच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी लागते. लेखनिक, सहाय्यक, टंकलेखक, लघुलेखक, लेखपाल, रोखपाल, विभागीय अधिकारी यासारख्या कर्मचाऱ्यांची किती प्रमाणात गरज आहे, हे प्रथम ठरविले जाते. नंतर भरती व निवडीचा कार्यक्रम तयार केला जातो. कार्यालयाचे काम सुरळीतपणे चालू राहण्यासाठी केवळ योग्य व पुरेशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून भागत नाही, तर त्यांच्या प्रशिक्षणाचीही तरतूद करणे जरुरीचे असते. नेमून दिलेले काम परिणामकारकपणे करण्यासाठी कर्मचाऱ्यांना शैक्षणिक किंवा तांत्रिक पात्रतेबरोबरच प्रशिक्षणाची जोड द्यावी लागते. प्रशिक्षणामुळे काम करण्याची सुयोग्य पद्धत कर्मचाऱ्यांना समजते. त्यांना आपापले काम अधिक कार्यक्षमपणे करणे शक्य होते.

आधुनिक काळात शैक्षणिक, सामाजिक संस्थांत, सरकारी खात्यात व व्यवसाय संस्थात सगळीकडेच प्रशिक्षणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढू लागले आहे. पूर्वी कर्मचाऱ्यांची निवड होऊन त्याला थेट कामावर पाठविले जायचे. कर्मचाऱ्यांना थोड्याफार सूचना देऊन

अनुभवाने काम शिकायला लावले जायचे. या प्रकारामुळे वेळेचा व सामुग्रीचा अपव्यय होत असे. उपकरणांची नासधूस होत असे. काम परिणामकारक व कार्यक्षमपणे होत नसे. अलिकडील काळात कार्यालयातील कामामध्ये विविधता, नावीन्य, त्यांचे गुंतागुंतीचे स्वरूप, त्यात सतत होणारे बदल यामुळे प्रशिक्षणाची तरतूद करणे अपरिहार्य बनले आहे. व्यवसाय संस्थांच्या चालकांना कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यायचे असल्यास कोणत्या पद्धतीची निवड करावयाची व प्रशिक्षणाचा कार्यक्रम कसा राबवायचा याबद्दल निर्णय घ्यावा लागतो. आधुनिक उत्पादन पद्धतीमध्ये प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरते. प्रशिक्षणामुळे कामगारांच्या कार्यक्षमतेत वाढ होते. कामगारांचे मनोधैर्य वाढते. कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीत घट होते. सामुग्रीच्या उपकरणांची नासधुस कमी होते. हे फायदे ही प्रशिक्षणामुळे होतात.

प्रशिक्षणाने कर्मचाऱ्यांच्या कामाला उजाळा मिळतो. तेच ते काम करून कंटाळलेले असल्याने कामगारांमध्ये प्रशिक्षणाने काम करण्यासाठी उत्साह निर्माण होतो. कामामध्ये नावीन्यता येते. त्यामुळे श्रमशक्ती वाढून उत्पादन वाढते. कामातील विश्रांती, कंटाळा दूर होतो.

खाजगी-सरकारी खात्यातील कर्मचारी असो किंवा शिक्षकी पेशा, लष्करी पेशा असो की, इतर संस्थामध्येदेखील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे असते. नोकरी नियुक्तीनंतरचे प्रशिक्षण तसेच नोकरी अंतर्गत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे असते. कारण कालमानानुसार उद्योगधंद्यात, यंत्रसामुग्रीत तिच्या परिस्थितीनुसार कर्मचाऱ्यांनाही नवनवीन कौशल्य शिकणे गरजेचे असते म्हणून प्रशिक्षण आवश्यक आहे. त्यामुळे हा प्रशिक्षणाचा कार्यक्रम अधिकाधिक परिणामकारकपणे राबविण्याचा प्रयत्न केला जातो. आज प्रशिक्षण घेणे काळाची गरज बनली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करा.

## ६.५ प्रशिक्षणाचे प्रकार

दिवसेंदिवस प्रशिक्षणाचे महत्त्व वाढत चालले आहे. प्रशिक्षणाची गरज वाढत आहे. म्हणून प्रशिक्षणाचा हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने व प्रशिक्षणाचा कार्यक्रम अधिकाधिक परिणामकारक करण्यासाठी योग्य पद्धतीची निवड करताना शिकण्यासंबंधीचे काही प्रमुख प्रकार निवडावे लागतात. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासंबंधी अनेक संस्था निर्माण झाल्या आहेत. त्यातून प्रशिक्षण देण्याच्या विविध पद्धती अस्तित्त्वात आल्या आहेत. उद्योगधंद्यात दिवसेंदिवस नवीन तंत्रज्ञानाची भर पडू लागल्याने निरक्षर कामगारांची संख्या कमी होऊ लागली आहे. तर संघटनेची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी खालील प्रकाराचा वापर केला जातो.

**१) व्याख्यान पद्धती:**

सर्वसाधारण मुद्यांवर एकाच वेळी अनेक व्यक्तींना माहिती देण्यासाठी व्याख्यान पद्धतीचा उपयोग केला जातो. परंतु तज्ञांच्या मते प्रौढ व्यक्तींना प्रशिक्षण देताना या पद्धतीचा क्वचितच वापर करावा, असे सांगितले आहे आणि जर या व्याख्यान पद्धतीचा वापर करणे आवश्यक असल्यास ही व्याख्याने संक्षिप्त व मनोरंजक ठरतील असा प्रयत्न केला पाहिजे. नाही तर ही पद्धती निरस, कंटाळवाणी वाटते.

**२) कथन पद्धती:**

या प्रकारच्या प्रशिक्षण पद्धतीत जास्तीत जास्त प्रश्नोत्तर पद्धतीचा वापर केला जातो. त्यामुळे कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष सहभागी झाल्याची जाणीव होते. परंतु प्रश्नोत्तरांचा प्रशिक्षण पद्धतीत वापर केल्यास त्याला शाळेचे स्वरुप प्राप्त होते. जर प्रशिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या मर्यादित असेल तर या पद्धतीचा चांगल्या प्रकारे उपयोग करणे शक्य होते.

**३) प्रात्यक्षिक पद्धती:**

प्रयोगशाळेत अशा पद्धतीचा नेहमीच वापर केला जातो. या पद्धती प्रकारात प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकाने केलेले प्रात्यक्षिक नुसतेच पाहण्यापेक्षा प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिक करुन दाखविण्याचीही संधी दिली जाते किंवा प्रात्यक्षिकात त्यांना सहभागी करुन घेतले जाते.

**४) परिषद पद्धती:**

या पद्धतीत प्रशिक्षणार्थींना गटवार चर्चा करण्यास सांगितले जाते. ही चर्चा चालू असताना प्रशिक्षक मार्गदर्शन करतात. या चर्चासत्राचा फायदा म्हणजे नवीन माहिती व नवीन कल्पनांच्या देवाणघेवाणीस मदत होते. आचारविचारांची देवाणघेवाण होते. त्यामुळे प्रशिक्षणार्थींना सहभागित्वाची जाणीव होऊन ते जागृतही राहतात.

**५) तांत्रिक प्रशिक्षण:**

उद्योगसंस्थेतील एका विशिष्ट परिस्थितीत कर्मचाऱ्यास अपेक्षित पद्धतीने प्रतिसाद देणे शक्य व्हावे हा या प्रशिक्षणाचा उद्देश असतो. परिस्थिती बदलल्यावर कर्मचारी उपयशी ठरतो. म्हणजे तांत्रिक कौशल्यासंबंधीच्या प्रशिक्षणाद्वारे वर्तमानकाळातील गरज भागविली जाते. परंतु भविष्यकालीन गरज भागविणे शक्य होत नाही. कारण परिस्थितीत बदल झाल्यास कामगारांना विशिष्ट तांत्रिक कौशल्याचे प्रशिक्षण दिलेले असल्याने तो अपयशी ठरतो. हा दोष दूर करण्यासाठी परिस्थितीत होणाऱ्या बदलानुसार प्रशिक्षण कार्यक्रमात आवश्यक ते बदल करणे जरुरीचे ठरते. या पद्धतीचा दुसरा दोष म्हणजे प्रशिक्षणात विशिष्ट प्रकारचे काम विशिष्ट पद्धतीनेच करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आपल्या गुण-कौशल्याचा, कल्पनाशक्तीचा वापर करता येत नाही. नवीन पद्धतीचा शोध लावून प्रगती करण्यावर बंधने येतात. हा दोष टाळण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमात काम करण्याच्या नवीन अधिक चांगल्या पद्धतीचा वापर करण्यावर भर दिला पाहिजे.

**६) कंपनीची धोरणे, नियम, कार्यपद्धती व कार्यक्रमासंबंधी प्रशिक्षण:**

हा प्रशिक्षणाचा प्रकार नसून कर्मचाऱ्यांना संस्थेच्या ध्येयधोरणाविषयी तिने हाती घेतलेल्या कार्यक्रमाविषयी माहिती देऊन त्यांना संस्थेच्या बाजूला वळविण्यासाठी हा एक प्रयत्न करण्यात येतो. अशा प्रकारची माहिती संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना देण्याची गरज असते. परंतु अशी माहिती कर्मचाऱ्यांना दिल्याने कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होत नाही व संस्थेची कार्यक्षमता प्रत्यक्षपणे वाढविणे शक्य होत नाही. परंतु अशा प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आपुलकीची, आत्मीयतेची भावना वाढीस लागणे शक्य होते. त्यामुळे एकूणच संस्थेची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होते. आधुनिक उत्पादन पद्धती गुंतागुंतीची बनत चालली आहे. म्हणून व्यवस्थापकीय प्रशिक्षण घेणे आज अत्यावश्यक बनले आहे. म्हणून व्यवस्थापन प्रशिक्षणासाठी खालील घटक लक्षात घ्यावे लागतात.

१) **व्यवस्थापकीय व पर्यवेक्षण कौशल्याचे प्रशिक्षण:** कार्यालयातील कर्मचाऱ्यांना अशा प्रकारचे प्रशिक्षण देऊन कार्यक्षमता वाढविण्यास मदत केली जाते. उद्योगधंद्यातील सर्व कर्मचाऱ्यांना म्हणजेच व्यवस्थापक, पर्यवेक्षक यांना मानवी संबंधाची गुंतागुंत, आधुनिक व्यवस्थापनाचे स्वरुप किंवा उद्योगधंद्यातील वातावरणाची नीटशी माहिती दिल्यास व्यवस्थापक, पर्यवेक्षक बदलत्या परिस्थितीला यशस्वीपणे तोंड देण्यास समर्थ होतात. त्यांची कार्यक्षमता वाढविण्यास मदत होते. त्यामुळे संपूर्ण संस्थेची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते.

२) **प्रारंभिक प्रशिक्षण:** नव्यानेच निवड केलेल्या कर्मचाऱ्यांना प्राथमिक स्वरुपाची माहिती देण्यासाठी असे प्रशिक्षण आयोजित केले जाते. अशा प्रारंभिक प्रशिक्षणात व्यवसाय, संस्था, संघटन, तिची उद्दिष्ट्ये व धोरणे, उत्पादन, उत्पादन प्रक्रिया, कर्मचाऱ्यांने करावयाच्या कामाचे स्वरुप, संस्थेतील महत्त्वाचे नियम इत्यादी बद्दल माहिती दिली जाते. अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे कर्मचारी संस्थेच्या उद्दिष्टाशी व कार्याशी परिचित होतात. त्यांना आपापल्या कार्यक्षेत्राची माहिती मिळणे व जबाबदारीची जाणीव होते. अशा प्रशिक्षणाचा कार्यक्रम कर्मचाऱ्यांची निवड झाल्यावर आयोजित केला जातो.

३) **कार्यक्षमता वाढीसाठी प्रशिक्षण:** व्यवसायात कर्मचाऱ्यांना बढती देण्यापूर्वी किंवा त्यांच्यावर जबाबदारीचे काम सोपविण्यापूर्वी आवश्यक ते प्रशिक्षण देण्याची सोय केली जाते. अशा प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. बढती देणे म्हणजे कर्मचाऱ्यांना अधिक जबाबदारीच्या व अधिकाराच्या जागेवर नेमणूक करणे. अशा जागेवरील कामाची परिपूर्ण माहिती होण्यासाठी व त्या स्थानाची जबाबदारी पेलण्याची क्षमता निर्माण करण्याच्या दृष्टीने या प्रशिक्षणाचा बराच उपयोग होतो.

४) **उजळणी प्रशिक्षण:** कर्मचाऱ्यांना सतत कार्यक्षम ठेवण्याच्या दृष्टीने एकदाच प्रशिक्षण देऊन भागत नाही. कालांतराने त्या कामाचे प्रशिक्षण देण्याची गरज त्यांना भासते. तसेच त्यांना कार्यरत व कार्याभिमुख करण्यासाठी पुन्हा पुन्हा मार्गदर्शन

करण्याची आवश्यकता असते. कामाच्या बदललेल्या पद्धती, सुधारलेले नियम इ. प्रकारची माहिती देण्यासाठी अशा प्रकारच्या प्रशिक्षणाची निश्चितच गरज भासते. अशा प्रकारे बदलत्या काळानुसार नवनवीन उदयास आलेल्या उद्योग व्यवसायामुळे प्रशिक्षणातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. आज प्रशिक्षण देणे व घेणे ही काळाची गरज बनली आहे. पूर्वी व्यक्तीला कोणताही अनुभव नसताना कामावर घेतले जायचे. परंतु  आधुनिक काळात ही परिस्थिती बदलल्याचे दिसून येते. जर एखाद्या व्यक्तीने प्रशिक्षण घेतले असेल तर नोकरीसाठी त्याला प्रथम प्रधान्य देण्यात येते. आज कोणत्याही क्षेत्रात, विभागात नोकरीतील कार्यक्षमता, गुणवत्ता, कौशल्य वाढविण्याची संधी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाने उपलब्ध झालेली आहे. म्हणून प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था निर्माण झाल्या आहेत. जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांनाही कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते. त्या प्रकारे प्रशिक्षण घेण्यासाठी कर्मचाऱ्यांना पाठविले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रशिक्षणाचे प्रकार कोणते ते सांगा.

## ६.६ शिक्षणाचा अर्थ आणि व्याख्या

१) “व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण होय.”

२) “शिक्षण म्हणजे जीवनाची तयारी होय.” आपले जीवन जगता येण्यासाठी आवश्यक ती कार्यक्षमता अंगी येणे आवश्यक असते. ती कार्यक्षमता, ज्ञान व कला संपादन करणे म्हणजेच शिक्षण होय.

३) शिक्षण म्हणजे “चारित्र्याची जडणघडण होय. “व्यक्तीला शुद्ध चारित्र्याची शिकवण शिक्षण देणे, योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, पाप-पुण्य इ. सर्व गोष्टींची शिकवण शिक्षण देते. व्यक्तीला सदाचारी बनविण्याचे कार्य शिक्षण करते. अशिक्षित व्यक्तीचे शिक्षित व्यक्तीत रुपांतर शिक्षणच करते. अज्ञाताकडून ज्ञाताकडे होणारी मानवाची वाटचाल म्हणजे शिक्षण होय.

सामाजिक मूल्य निर्माण करणे, समाजाचे प्रबोधन करण्याचे, समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा, परंपरा नष्ट करण्याचे महत्त्वाचे माध्यम म्हणजे शिक्षण होय. ज्यामधून माणूस घडविला जातो ते म्हणजे शिक्षण होय.

शिक्षणाचा शाब्दिक अर्थ: इंग्रजी शब्द 'एज्युकशन' हा लॅटिन भाषेतील 'एड्केटम' या शब्दापासून घेतलेला आहे. शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सुप्त गुणांचा विकास होय.

**शिक्षणाची व्याख्या :**

१) स्वामी विवेकानंद यांच्या मते, “व्यक्तीच्या पूर्णतेला अभिव्यक्त करणे म्हणजे शिक्षण होय.”

२) प्रसिद्ध तत्त्ववेत्ते जॉन डयुई यांच्या मते, "शिक्षण म्हणजे भावी जीवनाची तयारी नव्हे, तर शिक्षण म्हणजे भोवतालच्या नैसर्गिक व सामाजिक वातावरणाशी समरस होण्याची पात्रता व सामाजिक कार्यक्षमता मनुष्याच्या अंगी आणून देणे होय."

३) डॉ. राधाकृष्णन यांच्या मते, "लोकशाहीनिष्ठ शिक्षण म्हणजे लोकांना केवळ साक्षर करणे नव्हे किंवा त्यांना एखाद्या व्यवसायात तरबेज करणे नव्हे तर त्यापेक्षा काही अधिक आहे. ते म्हणजे मनाचे सौंदर्य, मानव प्राण्याविषयी आदर व एकसंध राहण्याचे कौशल्य होय. यातून मानवी ह्रदयाला सौंदर्य प्रप्त व्हावे."

४) "अर्थाजनासाठी व्यक्तीला सक्षम बनविण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय."

५) सर पर्सीनन यांच्या मते, "ज्या शिक्षणामुळे व्यक्तीची सर्वांगीण वाढ होईल तेच खरे शिक्षण होय."

वरील विविध व्याख्येवरून असे म्हणता येईल की, शिक्षणाने केवळ व्यक्तीविकास किंवा केवळ समाज विकास अशा टोकाच्या भूमिका न घेता दोन्हीत समन्वय साधणे आवश्यक आहे. व्यक्तीचा संपूर्ण विकास तर झालाच पाहिजे; पण त्याचवेळी समाजाचे कल्याण व हित साधणेही महत्त्वाचे आहे. व्यक्तीचा एकांगी विकास कित्येकदा समाज विघातक होण्याची शक्यता असते. व्यक्ती, समाज व राष्ट्र या तिन्हींचा विकास साधणे हे शिक्षणाचे कार्य होय. व्यक्तीचा सर्वांगिण विकास होणे हे समाजाला भूषवाह आहे. तर समाजाचे व राष्ट्राचे स्वास्थ्य व सुरक्षा व्यक्तीला हितकारक आहे. शिक्षणाने व्यक्ती, समाज व राष्ट्र या तिन्हीचा विकास साधावयास हवा.

शिक्षण हे मानवी संस्कृतीच्या संवर्धनाचे साधन आहे. सामाजिक मूल्य निर्माण करणे म्हणजे शिक्षण. शिक्षण हे गतिमान साधन आहे. समाजाचे प्रबोधन करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षण हे मानवातील पूर्णत्वाचा अविष्कार आहे. त्याच्या मनातील सुप्त बीजरुप क्षमतांचा विकास शिक्षणाने होतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) शिक्षणाचा अर्थ आणि व्याख्या सांगा.

## ६.७ विकासाचा अर्थ आणि व्याख्या

विकास ही एक प्रक्रिया आहे. पूर्वी विकास म्हणजे केवळ आर्थिक विकास होय असे मानले जात असे. आर्थिक विकास झाला की, इतर क्षेत्राचादेखील विकास झाला असे मानले जाई. परंतु आधुनिक काळात केवळ आर्थिक विकासाकडेच लक्ष दिले जात नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक इ. सर्वच दृष्टीने विकास होण्याची आवश्यकता वाटू लागली व त्या दृष्टीनेच प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे विकासाची नवीन संकल्पना मांडण्यात आली. विकासाची संकल्पना समजण्यापूर्वी आपण विकासाच्या काही व्याख्या प्रमाणे अभ्यासू.

१) **युनो :** "अशा देशास विकसनशील देश म्हणता येईल की, ज्यामध्ये प्रतिव्यक्ती वास्तविक उत्पन्न हे संयुक्त राज्य अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि युरोपच्या प्रतिव्यक्ती वास्तविक उत्पन्नाच्या तुलनेत कमी आहे."

२) **भारतीय नियोजन आयोग:** भारतीय नियोजन आयोगाने विकसनशील देशाची व्याख्या करताना म्हटले आहे की, "एका बाजूला अनुपयोग किंवा उपयोगाखाली असलेल्या मानवी शक्तीच्या भागाचे कमी किंवा जास्त प्रमाण आणि दुसऱ्या बाजूला नैसर्गिक संसाधनांचा उपयोग करण्यात आला नाही. याचे सहअस्तित्त्व असणारे वैशिष्ट्य असलेला देश होय."

३) **डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टा:** "आधुनिक तंत्रज्ञान, उच्च औद्योगिकरण, साधनांची आणि सेवांची जास्त उपलब्धता ज्या देशात असेल तो देश विकसित आहे असे म्हणता येईल."

४) **गुन्नार मिडील:** "तांत्रिक मूल्यांचा विकास आणि प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक व राजकीय स्तरावर त्याचा उपयोग करणे होय."

अशा प्रकारे विकास म्हणजे केवळ आर्थिक विकासच नाही, तर सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रातील विकास अभिप्रेत आहे. थोडक्यात, समाजाच्या संरचनेत असे परिवर्तन की जे सर्व वर्गाच्या मानव समूहाच्या जीवनात घडून येईल. म्हणून विकासाची ही नवीन संकल्पना व्यापक आहे. आर्थिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात देखील विकास घडून येणे म्हणजे विकास होय.

**आपली प्रगती तपासा :**

१) विकासाचा अर्थ आणि व्याख्या स्पष्ट करा.

## ६.८ शिक्षणाची तत्त्वे

समाज स्थितीशील कधीच नसतो. त्यात सतत परिवर्तन होत असतात. आधुनिकीकरणाची प्रक्रिया सतत चालू असते. त्यामुळेच पारंपरिक भारतीय समाजाजत हळूहळू बदल घडून त्याचे विद्यमान आधुनिक भारतीय समाजात रुपांतर झाले आहे. भारतात आधुनिकीकरणाची प्रक्रिया चालू आहे. सामाजिक एकता, आर्थिक समानता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, स्वातंत्र्य, बंधुता ही जीवनमूल्ये व राष्ट्रीय ध्येय आहेत. आधुनिकीकरण ही एक गतिमान संकल्पना असून, तिच्यामध्ये सामाजिक बदलाचा व आधुनिक काळात मिळतेजुळते घेण्याचा अर्थ अभिप्रेत आहे. आधुनिकीकरण हा शब्द प्रगतिसूचक आहे. नवे विचार, नवीन कल्पना, नवीन वस्तू यांचा स्वीकार करून जीवनात परिवर्तन करण्याची तत्परता म्हणजे आधुनिकीकरण होय. जुने, कालबाह्य टाकून नव्या काळानुरूप तर्कशुद्ध व विज्ञाननिष्ठ विचारसरणीचा स्वीकार म्हणजे आधुनिकीकरण होय. त्यासाठी राष्ट्रीय ध्येये व मूल्ये जोपासण्यासाठी शिक्षणातील तत्त्वांचा अंगीकार करणे आवश्यक आहे. ती तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत.

१) **ज्ञानासाठी अध्ययन:** जीवनास उपयुक्त ज्ञानाचा माहितीचा संचय करण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे ठरते. शिक्षणामुळे व्यक्तीची आकलन, संशोधन, ज्ञानपीपासू वृत्तीचा विकास होतो. ज्ञानक्षेत्राच्या विस्तारामुळे व्यक्तीमधील बौद्धिक जिज्ञासा जागृत होते. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते. तसेच व्यक्तीमध्ये जीवनशिस्त विषयक वृत्तीचा विकास करण्यास सहाय्यभूत ठरते. ज्ञानासाठी अध्ययन म्हणजे अध्ययनासाठी अध्ययन याचाच अर्थ एकाग्रता, स्मरण, विचार या आवश्यक शक्तीचा विकास होतो. सामाजिक विकासासाठी परस्पर समन्वय व सुसंगततेची सांगड घालण्यासाठी महत्त्वाचे कार्य शिक्षण करते.

२) **कृतीसाठी अध्ययन:** नोकरी-व्यवसायाने व्यापलेल्या औद्योगिक अर्थव्यवस्थेचा तसेच स्वतंत्र व अनौपचारिक कार्याने पादाक्रांत केलेल्या इतर अर्थव्यवस्थांचा प्रमुख्याने विचार केला जातो. २१ व्या शतकात यांत्रिकीकरणामुळे नोकरपेशा वर्गात अमूर्तता निर्माण झाली. ज्ञानाधारित किंवा कौशल्याधारित कार्याला औद्योगिक तसेच नोकरी पेशात महत्त्व प्राप्त झाले. नवीन उद्योग, व्यवसाय, नोकरी निर्माण करण्यावरच भविष्यकाळातील औद्योगिक अर्थव्यवस्था अवलंबून असते. त्यामुळे उत्पादकता वाढविण्यासाठी दिले जाणारे कार्यानुभवी शिक्षण देणे गरजेचे ठरते. हेच महत्त्वाचे शिक्षणाचे तत्त्व आहे.

३) **कौशल्याकडून क्षमतेकडे:** औद्योगिक क्षेत्रात विशेषतः तंत्रज्ञ, यंत्रचालकांना विशेष कौशल्य व ज्ञान आत्मसात करावे लागेल. कारण उत्पादकतेच्या दृष्टीने याच गोष्टीला विशेष महत्त्व असते. कारण वैयक्तिक क्षमता व कसबावरच राष्ट्रीय प्रगती अवलंबून असते. तांत्रिक प्रगतीमुळे उत्पादन, नवीन ज्ञान, यंत्रे यांची भर पडलेली आहे. पूर्णपणे शारीरिक कार्याची जागा आता संचलन, व्यवस्थापन, यंत्रांची देखभाल, कामकाजाचे आरेखन, अभ्यास व शासकीय कार्ये यासारख्या बौद्धिक व मानसिक कार्याने घेतली आहे. मानसिक व बौद्धिक शिक्षण घेणे आज जरुरीचे समजले जाते. हे शिक्षणाचे महत्त्वाचे तत्त्व समजले जाते. कामगारांच्या कौशल्यासाठी त्याच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी शिक्षण अत्यंत उपयुक्त ठरते. व्यक्तीतील कलागुण, जन्मजात कौशल्य लक्षात घेऊन त्याला योग्य प्रकारे शिक्षणाचे मार्गदर्शन करून व्यक्तीमध्ये व्यावसायिक कौशल्य विकसित करून व्यक्तीला अत्याधुनिक ज्ञानाने परिपूर्ण करणे हे महत्त्वाचे कार्य शिक्षणाला पार पाडावे लागते. विचारांचे आदानप्रदान, परस्पर संघर्ष यांचे निराकरण करण्याचे कौशल्य निर्माण करण्याचे कार्य शिक्षण करते.

४) **सर्वसामान्य ध्येयाकडे वाटचाल :** उद्योग व्यवसायात एकत्र काम करत असताना लोक दैनंदिन व्यवहारापासून दूर जाऊन त्यांच्यात सांघिक भावना, सामंजस्य व ऐक्यभावना निर्माण होते. त्यातील द्वेष कमी होतो. त्यांच्यातील सर्व प्रकारचे ताणतणाव, भेदभाव विसरला जाऊन त्यांच्यात एकात्मता, समानता रुजली जाते हे सर्व अनौपचारिक शिक्षणामुळे शक्य होते.

५) **व्यक्ती विकास करणे:** व्यक्तीच्या बौद्धिक, संवेदनात्मक, सौंदर्यशास्त्रविषयक, अध्यात्मिक मूल्यविषयक, कर्तव्यबुद्धी विषयक असा सर्वांगीण शारीरिक व मानसिक

विकास शिक्षणातून घडविला जातो. जीवनातील विविध परिस्थितीला सामोरे जाताना व्यक्तीला स्वतःचे निर्णय स्वतः घेता येण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होते. सध्याच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात व्यक्तीला स्वतःच्या समस्यांचे निराकरण स्वतः करता आले पाहिजे. निर्णयक्षमता, जबाबदारीची जाणीव, धोके पत्करण्याची क्षमता व विकास त्याने आत्मनिर्भरपणे करावा. उपयुक्त ज्ञानाच्या फायद्याबरोबरच काही समस्या ही मानवासमोर निर्माण होत आहेत. त्यांना सामोरे जाण्याचे व त्यावर मात करण्याचे धैर्य व्यक्तीमध्ये निर्माण करण्याचे काम शिक्षण करते. शिक्षण म्हणजे स्व-अस्तित्त्वासाठी अध्ययन होय. नैतिक जबाबदारीची जाणीव सांस्कृतिक, अध्यात्मिक, शारीरिक असा व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी अस्तित्त्वासाठी शिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे.

६) **मानवी संस्कृतीचा विकास:** मानवातील समानता, परस्परावलंबित्व याचबरोबर त्यांच्यातील स्पर्धा व भेदभाव याविषयी जागृती निर्माण करण्याचे कार्य शिक्षणाला करावे लागते. शिक्षणामुळे संस्कार रुजविणे शक्य होते. इतरांविषयी जाणून घेण्यासाठी व्यक्तीला प्रथम स्वतःला जाणून घेणे गरजेचे आहे. व्यक्तीमध्ये जातीधर्माविषयक आदरभावना, अहिंसात्मक वृत्ती निर्माण केल्यामुळे जातिभेद, द्वेषभावना कमी होण्यास मदत होते. विविध धर्माचे, चालीरितीचे योग्य शिक्षण भविष्यकालीन पिढीसाठी उपयुक्त ठरते. इतरांच्या जाणिवेपासून दूर न जाण्याची जाणीव त्यांच्यात निर्माण होते.

७) **सहजीवनासाठी अध्ययन:** विसाव्या शतकातील संघर्ष, हिंसक घटना अशा घटना कमी करण्यास शिक्षणाचे सहकार्य मिळते. हे संघर्ष टाळता यावेत, यातून शांततापूर्ण मार्ग निघावेत, लोकांमध्ये परस्परांबद्दल, त्यांच्या संस्कृतीबद्दल, अध्यात्मिक मूल्यांबद्दल आदरभावना वाढीस लावण्यासाठी शिक्षण मार्गदर्शन करते. पूर्वग्रहदूषित वातावरण व संघर्षाचे निराकरण हे शिक्षणामुळे शक्य होते.

२१ व्या शतकातील शिक्षणातील ही तत्त्वे त्यांचे महत्त्व देशाच्या व सकल विश्वाच्या विकासासाठी त्यांची उपयुक्तता लक्षात येते. वर्तमान स्थितीत व भविष्यकाळासाठी या तत्त्वांचे महत्त्व कोणीही नाकारू शकत नाही. त्याशिवाय समाज, देश व विश्व यांचा विकास साध्य होणार नाही. विकासासाठी, संतुलनासाठी, नवेपणा आणण्यासाठी नवीन उपक्रमांची गरज असते. त्यासाठी तत्त्वांची गरज असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) शिक्षणाची तत्त्वे कोणती ते लिहा.

## ६.९ यांत्रिक प्रशिक्षण व शिक्षण

आधुनिक युग हे यंत्रांचे व शक्तीचे मानले जाते. आज आपण विज्ञानाच्या जोरावर प्रगती केली आहे. तरीही भारतासारख्या देशातील कर्मचाऱ्यांना अधिकाधिक यांत्रिक

प्रशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. यांत्रिक प्रशिक्षण व शिक्षणाची देशाला नितांत गरज आहे. त्याचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

आधुनिक शिक्षण पद्धतीत त्यातील उद्दिष्टांमध्ये मोठा बदल झालेला आहे. परिस्थितीत बदल झालेला आहे. म्हणूनच तत्कालीन शिक्षण पद्धतीतही मोठ्या प्रमाणात योग्य बदल होण्याची गरज आहे. उद्योगधंद्यातील कर्मचाऱ्यांना अशा प्रकारचे शिक्षण देण्याची नितांत गरज आहे. कर्मचाऱ्यांना योग्य प्रकारे शिक्षण व प्रशिक्षण देऊन त्यातून कार्यक्षम व धडाडीचे तरुण व्यवस्थापक निर्माण करणे ही आजची काळाची गरज आहे. भारतातील व्यवस्थापकांनी आपल्या परिस्थितीचा सखोल विचार करून मनुष्यबळाची मुख्याधारित विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. भारतीय परिस्थिती आणि भारतीय मूल्यांची सांगड घातली जाते. भारतीय संस्कृतीची काही गुणवैशिष्टये, नीतिनियम आहेत. त्यांची जपणूक शिक्षणात केली जात आहे. प्रशिक्षणात व्यक्तीगत घटकांनाही प्रधान्य दिले आहे. त्यामुळे व्यक्तीच्या भावनांचा व उपजत गुणांचा विचार करता येणे शक्य होते. भारतीय नीतिनियमांचा विचार करून यांत्रिक प्रशिक्षण व शिक्षण अभ्यासक्रमात सामाजिक बांधीलकी, कार्यातील नैपुण्य, नेतृत्त्वातील धैर्य व गुणांचे संकलन यांचा समावेश केला जातो. आधुनिक काळात विज्ञान, तंत्रज्ञान, संपर्क ज्ञान व माहिती तंत्रज्ञान यांना महत्त्वाचे स्थान आहे. म्हणूनच यांत्रिक प्रशिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

आधुनिक युगात नवनवीन उद्योगधंद्यांची निर्मिती व वाढ होत आहे. नवनवीन अत्याधुनिक यंत्रसामुग्रीवरच हे कारखाने, उद्योगधंदे उभारले गेले आहे. अशा वेळेस यांत्रिक प्रशिक्षण घेतलेले कामगार आवश्यक असतात. असे कर्मचारी, कामगारांना यांत्रिक प्रशिक्षण देण्याची तरतूद केली जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) यांत्रिक प्रशिक्षण व शिक्षण यांचा संबंध सांगा.

## ६.१० विकास आणि प्रशिक्षण यातील संबंध

१) जगातील विविध देशात जो तांत्रिक विकास होत आहे त्याच्याशी मानवाला मिळतेजुळते घेता यावे व त्याला वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रातील प्रगतीच्या या काळात राहता यावे यासाठी यांत्रिक प्रशिक्षणाची गरज आहे.

२) औद्योगिक व तांत्रिक विकासातुळे समाजाच्या गरजा वाढलेल्या आहेत. परंपरागत अवजारे जाऊन अत्याधुनिक अवजारे आली असून, त्यामुळे उत्पादन वाढले आहे. अशा अत्याधुनिक साधनांच्या वापरासाठी प्रशिक्षण आवश्यक असते. त्यावरच विकास अवलंबून असतो.

३) यांत्रिक व औद्योगिक क्षेत्रातील ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. त्यामध्ये काम करणाऱ्यांना तज्ञ व्यक्तींची गरज निर्माण झाली आहे. अशा विविध स्तरावर अनेक तज्ञ पुरविणे ही आजची गरज आहे. ही गरज तांत्रिक प्रशिक्षण व शिक्षणाने पूर्ण होऊ शकते.

४) देशाच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध खनिज संपत्ती, पाणी, वीज, जमीन यांचा उपयोग करून घेणे आवश्यक असते. या विविध साधनसंपत्तीचा पुरेपुर वापर करून राष्ट्रीय विकास साधता येतो.

५) तांत्रिक शिक्षण - प्रशिक्षणामुळे उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या विविध स्तरावरील कर्मचारी उपलब्ध होऊ शकतात. तांत्रिक शिक्षणाच्या सोयीमुळे विविध स्तरावरील कुशल कारागीर व तंत्रज्ञ देशाला मिळू शकतात. त्यामुळे विकास करणे शक्य होते.

६) तांत्रिक प्रशिक्षण व शिक्षणामुळे देशातील उपलब्ध साधनसंपत्ती व मनुष्यबळाचा योग्य असा समन्वय साधून राष्ट्रीय विकास करण्यावर भर दिला जातो.

**आपली प्रगती तपासा :**

१) विकास आणि प्रशिक्षण यातील संबंध सांगा.

## ६.११ संघटनात्मक विकासातील प्रशिक्षण आणि विकासाचा संबंध

संघटनेमध्ये विविध उत्पादन प्रणालीचा वापर केला जातो. या पद्धतीमध्ये काही उणीवा / दोष असू शकतात. त्यांचा दुष्परिणाम उत्पादन पद्धतीवर होतो. त्याचा परिणाम संघटनेला भोगावे लागतात. त्या दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. उत्पादन प्रणालीमध्ये बदल करून नवीन उत्पादन व्यवस्था वापरली जाते. त्यामुळे उत्पादन सुरळीत होऊन उत्पादनाचा दर्जा उंचावतो आणि नफ्याच्या स्वरुपात संघटनेला फायदा होतो. यामुळे संघटनेच्या विकासाला गती मिळून संघटनात्मक विकासाची प्रक्रिया चालू होते.

संघटनात्मक विकास म्हणजे विशिष्ट विकास शक्तीचा वापर करून श्रमामध्ये सांस्कृतिक बदल घडवून आणणे म्हणजे संघटनात्मक विकास होय किंवा औद्योगिक संघटनेत ज्या पारंपरिक पद्धतीने उत्पादन केले जाते त्या उत्पादनामध्ये बदल घडवून आणून ग्राहकांना हव्या त्या सेवा देण्याकरिता संघटन प्रक्रियेत जो बदल घडविला जातो त्यास संघटनात्मक विकास म्हणतात.

प्रशिक्षण म्हणजे एखादा उद्योग-व्यवसाय प्रारंभ करण्याअगोदर त्या व्यवसायासंबंधी प्रत्यक्ष मार्गदर्शन दिले जाते त्याला प्रशिक्षण असे म्हणतात.

श्रम करणाऱ्या कामगारांना नवीन यंत्रतंत्राचे प्रशिक्षण दिल्यामुळे संघटनेची उत्पादनक्षमता विकसित होते. त्याचा फायदा संपूर्ण संघटनेला होऊन संघटनात्मक विकास घडून येतो. श्रमशक्ती विकासाच्या माध्यमातून कामगारांना विशिष्ट तंत्राचे प्रशिक्षण देऊन संघटनात्मक विकास घडवून आणला जातो. प्रशिक्षणामुळे संघटनेतील कामगारांच्या कुशलतेचा विकास होतो. उत्पादनात नावीन्यता निर्माण होते. कार्यक्षमतेचा विकास होतो. मागणीनुसार बदल करून मानवाच्या गरजांची पूर्ती करणे शक्य होते. अशा प्रकारे प्रशिक्षणामुळे संघटनात्मक विकास करणे शक्य होते. प्रशिक्षणाचा संघटनात्मक विकासावर अनुकूल परिणाम झालेला दिसून येतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) संघटनात्मक विकासातील प्रशिक्षण आणि विकासाचा संबंध स्पष्ट करा.

## ६.१२ सारांश

मानवी संघटनेला विकसित करण्यासाठी ज्या विविध प्रणालीचा वापर केला जातो त्यांचा वापर करून उद्योग - व्यवसायाचा विकास होऊन कामगार कल्याणाच्या विविध योजना अंमलात आणल्या जाऊ शकतात. उत्पादन व्यवस्थेमध्ये श्रम करणारा कामगार हा यंत्राप्रमाणे निर्जीव नसून, एक सजीव मानव आहे. याकरिता त्याला अधिक न राबवता कमी मेहनतीमध्ये अधिक उत्पादन करू शकणाऱ्या प्रणालीचे शिक्षण आणि प्रशिक्षणामार्फत मार्गदर्शन करून श्रमशक्तीचा विकास करण्याकरिता या प्रणालीचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे, हे सर्व जगाने मान्य केले आहे. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, तर प्रशिक्षण ही मर्यादित वेळेपर्यंत चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षण-प्रशिक्षणामुळे संघटनात्मक विकास होतो. आज सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास असा सर्वांगीण विकास अभिप्रेत आहे. प्रशिक्षणामुळे कामगारांच्या कार्यक्षमतेत वाढ होते. वाढत्या कार्यक्षमतेमुळे उत्पादन वाढते. उद्योगधंद्याचा फायदा होतो. राष्ट्रीय उत्पादनात वाढ होते. विकास साधण्यासाठी देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक अशा विविध मनुष्यबळाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. किंबहुना आपणास असे म्हणता येईल की वरील दृष्टीकोनानुसार कोणत्याही देशातील शैक्षणिक विकास हा त्या देशाच्या आर्थिक विकासाशी मनुष्यबळाच्या माध्यमाने निगडीत असतो. कारण आर्थिक विकासासाठी ज्याप्रमाणे तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, कुशल कारागीर, डॉक्टर्स या सर्वांतही वाढ होणे आवश्यक आहे. ते प्रशिक्षण-शिक्षणाने शक्य होते.

## ६.१३ प्रश्न

१) मानवी संसाधन प्रक्रियेत शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करा.

२) मानवी संसाधन विकासात प्रशिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

३) विकास आणि प्रशिक्षण यातील संबंध सांगा.

४) टिपा लिहा.

 १) शिक्षणाची तत्त्वे

 २) प्रशिक्षणाचे महत्त्व

 ३) प्रशिक्षणाचे प्रकार

 ४) यांत्रिक प्रशिक्षण व शिक्षण

❖❖❖❖

# ७

# संघटनात्मक संस्कृती आणि संघटनात्मक संस्कृतीचे प्रकार

## (ORGANIZATIONAL CULTURE AND TYPES OF ORGANIZATIONAL CULTURE)

**प्रकरण रचना:**

७.० उद्दिष्टये

७.१ प्रस्तावना

७.२ संघटनात्मक संस्कृतीचे प्रकार

७.२.१ वर्णनात्मक संस्कृती

७.२.२ कार्यात्मक संस्कृती

७.२.३ प्रमुख / प्राथमिक संस्कृती

७.२.४ दुय्यम संस्कृती

७.२.५ प्रभावी संस्कृती

७.२.६ अप्रभावी संस्कृती

७.२.७ राष्ट्रीय आणि संघटनात्मक संस्कृती

७.३ भारतीय प्रकार

७.४ अमेरिकन प्रकार

७.५ जपानी प्रकार

७.६ सारांश

७.७ शब्दार्थ

७.८ प्रश्न

## ७.० उद्दिष्टये

१ ) संघटनात्मक संस्कृतीची माहिती मिळविणे.

२) संघटनात्मक संस्कृतीचे प्रकार जाणून घेणे.

३) संघटनात्मक संस्कृतीचे ज्ञान प्राप्त करणे.

## ७.१ प्रस्तावना

समाजात विविध संघटना किंवा उद्योग अस्तित्त्वात असतात. उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची काम करण्याची पद्धती आणि विचारसरणी साधारणत: एकाच प्रकारची असते. त्यातून एक विशिष्ट प्रथा तयार होत जाते. तिलाच संघटनात्मक संस्कृती असे संबोधले जाते. या संस्कृतीचा अवलंब संघटनेतील बऱ्याच व्यक्तींमार्फत केला जातो. अशा प्रकारच्या संस्कृतीमुळे संघटनेतील व्यक्तींमध्ये आपुलकीची भावना तयार होते आणि ते परस्परांच्या जवळ येतात. परस्परांच्या समस्यांचा विचार करतात व ते एक संघटित होऊन त्याची उकल काढतात.

प्रत्येक संघटना प्रकारात वेगवेगळ्या प्रकारची संस्कृती आढळून येते. संघटनेच्या रचनेवर संस्कृतीचा प्रकार अवलंबून असलेला आढळतो. संघटनेत प्रत्येक व्यक्तीने कशा प्रकारचे वर्तन करायचे हे संस्कृतीनुसार ठरविले जाते. संघटनेच्या नियमांचे पालन संघटनेतील सदस्यांना करावेच लागते. तसेच संघटनेत समाविष्ट होणाऱ्या इतर नवीन सदस्यांनाही ते नियम शिकून घेऊन त्याचे पालन करावे लागते. संघटनात्मक संस्कृती ही एक विचार-आचार पद्धती असते. जी सर्व सदस्यांना अवगत असणे गरजेचे असते. संघटनेच्या संस्कृती कामगारांची ओळख बनते म्हणजे कामगार अशा प्रकारचे वर्तन करतो त्या वर्तनानुसार विशिष्ट कामगार कोणत्या संघटनेचा सदस्य आहे हे ओळखले जाते. अशा या संघटनात्मक संस्कृतीचे विविध प्रकार पडतात. ते प्रकार आपण या प्रकरणात अभ्यासणार आहोत.

## ७.२ संघटनात्मक संस्कृतीचे विविध प्रकार

समाजात अस्तित्त्वात असणाऱ्या विविध संघटनांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या पद्धती रुढ झालेल्या असतात. संघटनेतील कर्मचारी आपापल्या संघटनेत रुढ झालेल्या आचार-विचार पद्धतीनुसार करीत असलेल्या वर्तन प्रकारालाच संघटनात्मक संस्कृती असे संबोधले जाते. अस्तित्त्वात असलेले संघटनात्मक संस्कृतीचे प्रकार पुढीलप्रमाणे :

### ७.२.१ वर्णनात्मक संस्कृती :

संघटनेत अस्तित्त्वात असणाऱ्या वर्तन पद्धतीची विस्तृत माहिती संस्कृती प्रकारात येते. संघटनेत अस्तित्त्वात असणारे विविध नियम, प्रथा यांची माहिती कामगारांना दिली जाते. कामगार त्यानुसार आपले वर्तन करतात. नियमांच्या चौकटीत राहून व्यक्ती आपल्या संघटनेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी प्रयत्नशील राहतात. संघटनेतील कामगार आपल्या संघटनेबाबत सतत जागरूक असतात. ते संघटनेकडे टीकात्मक दृष्टीकोनातून पाहतात. कामगारांच्या काम करण्याच्या पद्धतीत कशी सुधारणा करता येईल, जास्तीत जास्त उत्पादन कमी वेळात कसे मिळू शकेल, याकडे व्यवस्थापन मंडळ लक्ष देते. कामगारांना विविध प्रलोभने देऊन त्याच्याकडून चांगले काम करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. परिस्थितीनुसार संघटनेच्या ध्येयधोरण आणि कार्यप्रणालीत बदल घडवून आणले जातात. याबाबत कामगार आणि व्यवस्थापन मंडळ सतत जागरूक असल्याने

संघटनेच्या विकास घडून येतो; पण त्याचबरोबर संघटनात्मक संस्कृतीही दृढ होत जाते. उदा. कामाच्या ठिकाणी कामगार व इतर कर्मचारी आगमन आणि निगर्मन करताना नोंद पुस्तिकेत नोंद करतात. यामुळे कामगार कामावर वेळेत येतो की नाही, कधी बाहेर जातो याची माहिती व्यवस्थापन मंडळास प्राप्त होते.

सूचनापेटीद्वारा कामगार आणि इतर कर्मचारी यांच्याकडून संघटनेच्या उद्दिष्टपूर्तीसंदर्भात सूचना घेतल्या जातात. संघटनेला त्याचा फायदा होतो.

अशा प्रकारची वर्णनात्मक संस्कृती संघटनेत रुजविली जाते.

### ७.२.२ कार्यात्मक संस्कृती:

ज्याप्रमाणे वर्णनात्मक संस्कृती काही संघटना किंवा उद्योगांमध्ये आढळते, त्याचप्रमाणे कार्यात्मक संस्कृती ही काही उद्योगांमध्ये आढळते.

कार्यात्मक संस्कृती कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या कृतीवर आधारित असते. संघटनेतील कर्मचारी कशा प्रकारची कामे करतात, त्यांना कशा पद्धतीचे शिक्षण-प्रशिक्षण दिले जाते, त्यांच्यातील संबंध कशा प्रकारचे आहेत, यावर आधारित हा संस्कृती प्रकार असतो. संघटनेतील नियम वा प्रथा ज्या स्वरूपात असतात, त्यानुसार संस्कृतीत बदल आढळतो.

कार्यात्मक संस्कृतीचे पुढील चार उपप्रकार पडतात :

#### अ) संस्थात्मक संस्कृती :

संस्थात्मक संस्कृती ही एक प्रकारची ज्ञानवर्धक संस्कृती असते. कर्मचाऱ्यांचा विकास घडवून आणण्यासाठी काही कार्यक्रम व प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. या संस्कृती प्रकाराचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे योग्य व्यक्तींची निवड करणे आणि त्यांना प्रशिक्षण देऊन कुशल बनविणे असे असते. विशिष्ट पात्रता असणाऱ्या व्यक्तींची नियुक्ती केलेली असल्यास त्यांना प्रशिक्षण देणे सुलभ जाते. अशा प्रशिक्षित व्यक्तींचा उपयोग संघटनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी होतो. संघटनेची मूल्ये कामगारांमध्ये रुजविण्यासाठी प्रशिक्षण आणि विकासाचे कार्यक्रम तयार करून संघटनेची संस्कृती कामगारांमध्ये रुजविली जाते. उदा. दूरचित्रवाणी, व्याख्यान, सराव वगैरे. अध्यापक प्रशिक्षणार्थीचे प्रश्न जाणून घेऊन त्याचे निराकरण करतो. संघटनेची मूल्ये त्यांच्यात रूजवितो.

#### ब) संघ संस्कृती :

संघ संस्कृती सभासदत्त्व, निष्ठा आणि विश्वासावर अवलंबून असते. कोणत्याही संघटनेचे किंवा कारखान्यात काम करणारे कर्मचारी त्या संघटनेचे प्रथम सभासद बनतात. संघटनेच्या नियमांची ते माहिती मिळवतात. नियमानुसार आपले वर्तन करतात. संघटनेच्या इतर सभासदांवर विश्वास ठेवण्यास शिकतात. तसेच निष्ठेने विशिष्ट संघटनेचे सभासदत्त्व प्राप्त केल्यानंतर तेथील संस्कृतीचा अवलंब करतात.

संघटनेचे सभासदत्त्व प्राप्त करणे संघ संस्कृतीच्या निर्मितीसाठी आवश्यक बाब असते. संघटनेच्या सभासदांमध्ये एकजुटीची भावना वाढत जाते. संघटनेचे उद्दिष्ट प्राप्तीसाठी सभासद कोणत्याही प्रकारचे श्रम करण्यास तयार होतात.

**क) गट संस्कृती :**

संघटनेत काम करणारे विविध सभासद असतात. ते विविध स्तरावर आणि विभागात काम करतात. हुशार आणि अनुभवी लोकांकडून गट संस्कृती निर्माण केली जाते. विविध विभागात आणि स्तरावर काम करणाऱ्या अनेक लोकांपैकी अनुभवी, हुशार तल्लख बुद्धीमत्ता असणारे आणि तज्ज्ञ लोक परस्परांना जास्तीत जास्त काम करण्यास प्रेरित करतात; पण त्याचबरोबर ते संघटनेचे उद्दिष्ट कमी वेळात साध्य करण्यासाठी परस्परांना मदत करतात. ते सर्वजण हुशार, तज्ज्ञ आणि अनुभवी असल्याने त्यांना एकमेकांच्या बुद्धीचा आणि अनुभवाचा उपयोग होतो. स्वत:ला अवगत असलेले ज्ञान आणि विद्या गटातील व्यक्तींना देतात. त्याचा उपयोग त्यांना उद्दिष्टपूर्तीसाठी होतो. ते परस्परांना मदत करत असल्याने त्यांच्यात सहकार्याची भावना तयार होण्यास मदत होते. तसेच ते एकमेकांच्या समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न करतात. यामधून संघ संस्कृतीचा विकास घडून येतो.

**ड) संरक्षणात्मक संस्कृती :**

संघटनेच्या संरक्षणात्मक कृतीलाच रक्षणात्मक संस्कृती असेही संबोधले जाते. आधुनिक काळात कोणत्याही संघटनेत कोणत्याही प्रकारचे काम करणे म्हणजे एक तारेवरची कसरत समजली जात असते. त्यांचे पालन करणे अनिवार्य असते. नेमून दिलेले काम विशिष्ट चौकटीत राहूनच व्यक्तीला पूर्ण करावे लागते. प्रत्येकावर वेगवेगळ्या प्रकारची काही अधिकारही दिलेले असतात. मिळालेले अधिकार आणि पार पाडायची जबाबदारी यात व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा बदल करता येत नाही. त्यात बदल किंवा उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस संघटनेमार्फत बहिष्कृत करण्याची शक्यता असल्याने या संस्कृती प्रकारातील कामगार एकमेकांना सहकार्य करतात. व्यक्तीकडून कोणत्याही प्रकारचे वाईट किंवा निम्न दर्जाचे काम होणार नाही, याची काळजी घेतात.

वरील सर्व संस्कृती प्रकार संघटनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभावी ठरतात.

**७.२.३ प्रमुख / प्राथमिक संस्कृती :**

संघटनेतील सभासदांकडून जी सामायिक किंवा सामान्य मूल्ये आत्मसात केली जातात त्यालाच आपण संस्कृती असे म्हणतो. लहान संघटनेत किंवा उद्योगात एकच संस्कृती आढळते; परंतु मोठ्या संघटनेत एकाच प्रकारच्या संस्कृतीचा अवलंब करणे अशक्य असते. अशा वेळेस प्रमुख संस्कृती आणि दुय्यम संस्कृतीचे प्रकार तेथे आढळतात.

ज्या वेळेस संघटनेतील बहुसंख्य व्यक्तींकडून एकाच प्रकारच्या नियमाचे वा मूल्यांचे पालन केले जाते तेव्हा त्या संस्कृती प्रकारास प्रमुख संस्कृती संबोधले जाते. काही महत्त्वाच्या मूल्यांमूळे संघटनेला विशिष्ट स्वरूप प्राप्त होऊन तिला ओळखणे सुलभ होते.

त्यामुळे संघटनेतील सभासदाच्या वर्तणुकीत सारखेपणा येतो आणि संघटनेतील सदस्यांमध्ये एकोपा निर्माण होण्यास मदत होते. संघटनेचे सभासद संघटनेची उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करतात. लहान उद्योगात ही संस्कृती आढळते.

### ७.२.४ दुय्यम संस्कृती :

सर्वसाधारणत: मोठ्या स्वरूपाच्या संघटन प्रकारात दुय्यम संस्कृती प्रकार आढळतो. त्या ठिकाणी छोट्या किंवा दुय्यम संस्कृती प्रकाराचा विकास होतो. हा विकास विभागानुसार, पदानुसार, स्तरानुसार किंवा भौगोलिक वातावरणानुसार घडून आलेला आढळतो. सामान्यत: वेगवेगळ्या विभागात काम करणाऱ्या लोकांमध्ये विभागानुसार दुय्यम संस्कृती बदलत जाते. प्रत्येक विभागातील व्यक्ती आपल्या विभागानुसार संघटनेची मूल्ये आणि नियम आत्मसात करतात. विभागानुसार जरी दुय्यम संस्कृतीची निर्मिती होत असली तरी सर्व सभासदांचे प्रमुख धोरण संघटनेचे ध्येयपूर्ती करणे हेच असते. तसेच विभागानुसार ही संस्कृती तयार होत असल्याने त्यात दृढता अधिक असते. प्रत्येक विभागातील व्यक्ती स्वत: आणि इतर व्यक्ती मूल्ये आणि नियमांचे पालन करतात की नाही याकडे अधिक लक्ष देतो. त्यामुळे या संस्कृती प्रकारात बारीक-सारीक गोष्टींचे पालन केले जाते. मोजक्या लोकांकडून या संस्कृतीचे पालन होत असल्याने त्यांच्या समस्या, अनुभव आणि वर्तन पद्धती समान असते.

### ७.२.५ प्रभावी संस्कृती :

ज्या संघटन प्रकारातील बहुसंख्य सभासदाकडून प्रभावीपणे मूल्ये किंवा नियम आत्मसात केली जातात त्या संस्कृती प्रकारास प्रभावी संस्कृती संबोधले जाते.

संघटनेतील सभासदांवर प्रभावी संस्कृतीचा अधिक प्रभाव आढळतो. संघटनेला टिकवून ठेवण्याचे आणि बळ देण्याचे कार्य प्रभावी संस्कृतीमार्फत केले जाते. याचा संघटनेच्या सभासदांवर प्रभाव अधिक असल्याने ते संघटनेला चिटकून राहतात. संघटना सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात येत नाही. संघटनेच्या यशात प्रभावी संस्कृतीचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. प्रभावी संस्कृतीचा अवलंब संघटनेतील अनेक लोकांकडून परिणामकारकपणे केला जातो. प्रभावी संस्कृतीचा संघटनेतील सभासदांवर अधिक नियंत्रण असते. प्रभावी संस्कृतीचे काही फायदे पुढीलप्रमाणे :

अ) व्यवस्थापन मंडळाचे आपल्या कामगारांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर प्रभावी नियंत्रण असते.

ब) संघटना सोडून जाणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी असते.

क) यामुळे कर्मचारी आपल्या संघटनेशी एकनिष्ठ राहून दिलेली जबाबदारी पार पाडतात.

ड) व्यक्तीच्या वर्तनाला विशिष्ट दिशा मिळते. त्याचबरोबर व्यक्तीचे वर्तन स्वनियंत्रित बनते.

इ) सभासदांचे मानसिक धैर्य वाढण्यास मदत होते आणि वर्तनास चालना मिळते.

ई) सभासदाचे सामर्थ्य वाढण्यास मदत होते.

वरील गोष्टींमुळे प्रभावी संस्कृती महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे संघटनेचा विकास घडून येण्यास मदत होते.

### ७.२.६ अप्रभावी संस्कृती :

संघटनेच्या सभासदांवर अप्रभावी संस्कृतीचा जास्त परिणाम होत नाही. संघटनात्मक मूल्ये संघटनेतील सभासदांकडून अधिक प्रमाणात व प्रभावीपणे पाळली जात नाहीत. संघटनात्मक मूल्यांचा प्रभाव सभासदांवर कमी असल्याने सभासदांमध्ये संघटनेविषयी विशेष आपुलकी निर्माण होत नाही, त्यामुळे सभासद काही वेळेस संघटना सोडण्याचाही विचार करतात. अप्रभावी संस्कृतीमुळे संघटना यशस्वी होतेच असे नाही, तर काही वेळेस तिला यश मिळण्यास वेळ लागतो. बऱ्याचदा अप्रभावी संस्कृती सभासदांचे मानसिक ध्यैर्य आणि सामर्थ्य वाढविण्यास अपुरी पडते. तसेच सभासदाला आपल्या जबाबदारीची जाणीवदेखील होऊ शकत नाही. सभासदांच्या वर्तनाला योग्य दिशा मिळत नाही. व्यक्तीचे स्ववर्तनावर नियंत्रण राहत नाही. सभासदाला संघटनेच्या ध्येयपूर्तीसाठी योग्य दिशा प्राप्त होत नाही व चालनाही मिळू शकत नाही. या कारणांमुळे अप्रभावी संस्कृती फार कमी संघटन प्रकारात किंवा उद्योगात आढळते.

तसेच यातील कामगार निष्काळजी, बेजबाबदार असतात. त्यांच्या कामाबाबत ते एकनिष्ठ नसतात. नियमांचे उल्लंघन करतात. कामगार कोणत्या परिस्थितीत कशा प्रकारचे वर्तन करेल, याची भविष्यवाणी कोणीही करू शकत नाही; कारण कामगार प्रत्येक वेळेस वेगवेगळे वर्तन करीत असतात. त्यांच्या वर्तनात एकसंघता नसते. त्यांच्यामध्ये प्रेमाचे व आपुलकीचे वातावरणही तयार झालेले नसते.

### ७.२.७ राष्ट्रीय संस्कृती आणि संघटनात्मक संस्कृती :

संघटनात्मक संस्कृती ही संघटनेच्या आजूबाजूच्या परिस्थितीवर अवलंबून असते. स्थानिक परिस्थितीनुसार संघटनात्मक संस्कृतीत बदल होतो. कारखान्यांची  निर्मिती व स्थापना ज्या प्रदेशात झालेली असते त्या प्रदेशाच्या चालिरीती, प्रथा-परंपरा व विचारसरणीचा परिणाम संस्कृतीवर होतो. तेथे स्थानिक पातळीवरील संघटनात्मक संस्कृती बनते. उदा. संघटनेमधील रजा (सुट्टी), सण, धार्मिक विश्वास आणि श्रद्धा वगैरे. संघटनेचे सदस्य आपल्या स्व- संस्कृतीवर आधारित वर्तन करतात. एकाच उद्योगाचे विविध विभाग देशातील वेगवेगळ्या ठिकाणी पसरलेले असतील, तर प्रत्येक विभागाच्या सुट्ट्या वेगवेगळ्या असतात. उदा. टाटा समूहाचा एखादा प्रकल्प बंगालमध्ये असेल व दुसरा महाराष्ट्रात असेल तर बंगालमधील कामगारांना दुर्गापूजेची सार्वजनिक सुट्टी दिली जाते व महाराष्ट्रातील कामगारांना शिवजयंतीची सुट्टी दिली जाते.

राष्ट्रीय संस्कृती ही संघटनात्मक संस्कृतीपेक्षा विशाल आढळते. कामगारांना आपल्या देशाचा अभिमान असतो. राष्ट्रीय मूल्यांशी ते एकनिष्ठ असतात. सर्वधर्मसमभावाचे तत्त्व कामगारांमध्ये रूजलेले असले तर राष्ट्रीय संस्कृतीच्या निर्मितीस चालना मिळते. कामगार स्वत:च्या धार्मिक उत्सवांना महत्त्व देतात. ते आपल्या देशाचा विचार अधिक

करतात, देशासाठी काम करण्याची भावना, त्यांच्यात रुजलेली असते. विविध भाषा बोलणारे किंवा विविध धर्मांचा अवलंब करणारे व्यक्ती एकत्रितपणे, एकजुटीने राष्ट्रीय विकासासाठी प्रयत्न करतात. राष्ट्रीय सुट्ट्यांचाही उपभोग घेतात. उदा. भारतातील कामगार १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे कामगार दिन सारखे सण एकत्रितपणे साजरे करतात.

वरील प्रकारांव्यतिरिक्त काही प्रकार पुढीलप्रमाणे आहेत. हे प्रकार उद्योगातील कामाच्या स्वरूपानुसार पडलेले आहेत.

**१) कामगार संस्कृती :**

यालाच कार्य संस्कृती असेही संबोधले जाते. हा संस्कृती प्रकार कार्याच्या किंवा कामाच्या यशस्वीपणावर आधारलेला असतो. उद्योगाचे यश हे कामगाराच्या ज्ञान, कुशलता, शिक्षण, पात्रता आणि जबाबदार वृत्तीवर आधारलेली असते. कामगार जितके तज्ञ व हुशार असतील तितके उद्योगास यश लवकर प्राप्त होते. कामगारांमध्ये कुशलता व ज्ञान वाढविण्याच्या दृष्टीने संघटना प्रयत्नशील असते. अशा प्रकारची संस्कृती सामान्यपणे सर्वच उद्योगात जोपासली जाते.

**२) अभियांत्रिकी संस्कृती :**

अभियांत्रिकी संस्कृती सर्वसाधारणपणे तज्ञ किंवा विशेषज्ञामध्ये जोपासली जाते. ते आपल्या उद्योगाचा अधिकाधिक विकास होण्याच्या दृष्टीने सतत नवीन शोध लावतात, प्रयोग करतात, वेगवेगळ्या स्वरूपातील विषयाशी पूरक अशी माहिती गोळा करतात, तिचा विश्लेषणात्मक दृष्टीने अभ्यास करून आपणास पूरक अशा माहितीचा वापर आपल्या कामात करून घेतात. यांत्रिकतेवर ते अधिक भर देतात. मानवी बळाचा कमीत कमी वापर करून अधिकाधिक उत्पन्न व उत्पादन कसे काढता येईल, यासाठी ते प्रयत्नशील असतात. तसेच कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणते उपाय करता येतील, याबाबत प्रयत्नशील असतात. तसेच कामगारांचे काम अधिकाधिक सोपे व सुलभ करण्याकडे त्यांचा प्रयत्न असतो. ते आपापल्या कामात निष्णात असतात. अशा प्रकारची संस्कृती जोपासण्याचा ते सतत प्रयत्न करतात.

**३) कार्यकारी संस्कृती :**

तज्ज्ञ लोकांनी सूचविलेल्या सर्व सूचनांची कार्यवाही करण्याचे काम व्यवस्थापक आणि मंडळामार्फत केले जाते. त्यांनी केलेल्या सूचना आणि सूचविलेल्या सुधारणा अंमलात आणण्यासाठी कोणत्या स्वरूपाच्या बदलाची आवश्यकता आहे, त्यासाठी कोणते प्रयत्न करावे लागतील याबाबतचे निर्णय घेण्याचे काम उच्चस्तरीय मंडळामार्फत घेतले जातात. त्यांच्यामार्फत विविध मूल्यांची आणि नियमांची निर्मिती केली जाते व इतर कर्मचाऱ्यांमार्फत त्याची कार्यवाही केली जाते की नाही याचे सर्वेक्षण केले जाते.

संघटनेमार्फत तयार झालेल्या संस्कृतीचे पालन करणे व ती टिकवून ठेवण्याचे काम कार्यकारी मंडळामार्फत केले जाते. उच्चस्तरीय मंडळामार्फत मुलाखतीद्वारा योग्य

व्यक्तींची नियुक्ती केली जाते. शिक्षण व प्रशिक्षणाद्वारा त्यांचा विकास घडवून आणला जातो, त्यांच्या कामाचे मूल्यमापन केले जाते, बक्षिसाद्वारा त्यांच्या कामात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जातो. जर एकाच जागेसाठी अनेक व्यक्तींचे अर्ज आल्यास व्यक्तिगत मुलाखतीव्यतिरिक्त वेगवेगळ्या स्तरावर त्यांची पात्रता अजमावली जाते. त्यातून सुयोग्य व्यक्तीची निवड केली जाते. परंतु निवड करताना चांगले काम करणाऱ्या व्यक्तीपेक्षा संघटनेच्या संस्कृतीशी तादाम्य पावणाऱ्या व्यक्तीची निवड केली जाते. अशा प्रकारची संस्कृती व्यवस्थापन मंडळामार्फत संघटनेत रुजविली जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) संघटनात्मक संस्कृतीचे विविध प्रकार सांगा.

## ७.३ भारतीय संघटनात्मक संस्कृती

